मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ८० ✦ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ डिसेंबर २००९

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेम नमस्कार.

मागच्या सप्टेंबरच्या 'हितगुज' अंकात दोन कार्यक्रमांची निमंत्रणे होती. त्यातील रविवार दि.२५ ऑक्टोबर २००९ला मराठे प्रतिषठानची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभ आपली अुपस्थिती लक्षणीय असल्याने चांगल्या प्रकारे पार पडला. आता बरोबर महिन्याने दि.२५ डिसेंबरला पुणे शाखेचा वर्धापन दिन व २०१०ची दैनंदिनी प्रकाशन समारंभ आहे. या वेळीही आपण अुपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविणार याची मला निश्चिती आहे.




दि.२६ ऑगस्ट २००९ला अुदयपूर येथे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ.अब्दुल कलाम यांच्या हस्ते 'लाइफटाइम अचीव्हमेंट ॲवॉर्ड' जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना श्री. मोहनराव मराठे (पृ.३६५)

या अंकात श्रीमती शालिनीताई मराठे (वय अवघे ८७) यांचा जीवनाचे ध्येय गवसले या शीर्षकाचा लेख प्रकाशित केला आहे. या लिखाणाला आत्मस्तुतीचा थोडा वास आल्यासारखे वाटेल. परंतु पुढे संपूर्ण लेख वाचल्यावर, नेहमीच्या प्रापंचिक गोष्टींवर भर न देता अध्यात्मिक जीवनावर लेखात प्रकाश पडला आहे. त्यामुळे लेखिकेने एक अध्यात्मिक पातळीवर जाऊन वैचारिक उंची गाठली आहे हे लक्षात येऊन वाचकांना हा लेख आवडेल अशी आशा आहे.

''माहेरच्या अंगणात'' हा सौ.निलांबरी ताईंचा अत्यंत भावपूर्ण लेख आहे. विशेषकरून मोठ्या भावाविषयी त्यांनी लिहिलेले मनाला भावते. खरं तर सप्टेंबरच्या अंकात हा लेख प्रकाशित करणार होतो. परंतु जागेअभावी प्रकाशित करता आला नाही. पण त्याची फार मोठी किंमत मोजावी लागली. कारण दुदैवाने त्यांचा मोठा भाऊ आज आपल्यात

*(पृष्ठ ५ वर)*

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे : ८/१३, सहकार नगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉
दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
◆ अक्षरजुळणी : सौ.सुप्रिया रेडकर (लक्ष्मी ग्राफिक्स), दादर ◆



क्रांतिवीरांचे बलिदान
पहायलाच हवे
• blue lagoon
अंदमान 4 nights 5 days
Sight Seeing
Sound & Light Show,
Cellular Jail,
Chatham Saw Mill,
Anthropological Museum,
Fisheries Museum,
Cottage Industries Emporium,
Ross Island,
North Bay Island,
Viper Islands,
wandoor beach,
Mount Harriet.
Tour cost : Rs - 9090/-only
Air fare extra
Mumbai-Port Blair &
Port Blair-Mumbai by Air
dec-20,jan-13,feb-3
only for ssc / hsc
Student Special
30 MARCH 2010
आमच्या इतर सहली
अंबाजोगाई
3 1/2 शक्तिपिठे
२१ गणपती दर्शन यात्रा.
कोस्टल कर्नाटकातील
अष्टविनायक दर्शन
आपले
कुलस्वामी दर्शन
पंचक्षेत्र दर्शन
exclusive
Costal Karnataka
coorg
the scotland of india
वायनाड
Wayanad
hills,rocks & valleys of kerala
tour date : 8 jan 2010
tour cost : 8800
including
3ac rail tkt
आयोजकः राजेश रानडे.
अनोळखी जगाची ओळख
TOURWAYS
90290 90690
92232 73496
22-65 281 281
C-305 Palm Acres.M.P.Rd,Mulund east Mumbai 81

# ‘जीवनपथाचे ध्येय गवसले’

**लेखिका - शालिनी मराठे**

आयुष्याची ८७ वर्षे आताच संपली. आता मी एका शान्त, समाधानी, कृतकृत्य जीवनाचा आनंद उपभोगीत आहे. या संपूर्ण आयुष्यात मोठमोठ्या पदावर काम करायला मिळाले, मानसन्मान झाले. याच वर्षी चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे ‘यशस्वी जीवन’ असा गौरव पुरस्कार मिळाला. International Women's Day (जागतिक महिला दिन) ८ मार्च २००९ या दिवशी मुंबई महानगरपालिकेतर्फे महापौर यांच्या हस्ते सत्कार केला गेला. अशा वेळी असे मनात येते की गुरुदेव स्वामी चिन्मयानंद योग्यवेळी आपल्या जीवनात आले नसते तर? म्हातारपणाच्या व्यथांची विवंचना करीत, वृद्धत्वाला दोष देत, निष्क्रीय निरर्थक, रसहीन जीवन मी कदाचित जगत राहिले असते! जीवनात शेवटपर्यंत रस घ्यायला, जिवंतपणा ताजा ठेवायला योग्यवेळी मिळालेल्या या सत्संगाचा केवढा उपयोग झाला आहे! गुरुदेवांची शिकवण व त्याप्रमाणे प्रत्यक्ष व्यवहार हे लक्षात ठेवून जर शेवटच्या घटकेपर्यंत कार्यरत राहिले तर मृत्युच्या स्वाभाविक भीतीचा विचार करायला वेळच कुठे आहे? गुरुदेवांनी एकदा शिकवले ‘आयुष्यातल्या अनेक अनुभवांना, आपण धीराने शांतपणे तोंड देत राहिलो आहे. मृत्यू हाही असाच एक अनुभव आहे. त्याला भ्यायचे कशाला? ‘All Experiences exist in me.’ गुरुदेवांनी सांगितलेली कामे करताना येवढा उत्साह व आनंद वाटतो की या वयातील प्रकृतीच्या स्वाभाविक तक्रारींना तो मागे सारतो. नाहीतर या वयात बोलताना प्रकृतीशिवाय इतर विषय क्वचितच सापडला असता! कुणीही भेटले तरी पहिला प्रश्न असतो, ‘तब्बेत कशी आहे?’ हा प्रश्न विचारून ते मला माझ्या वयाची आठवण करून देतात त्याचा राग येतो!

माझे जीवन घडवण्यात माझ्या वडीलांचा फार मोठा वाटा आहे. माझ्या लहानपणी आमच्या घरात आध्यात्मिक वातावरण मुळीच नव्हते. माझे वडील परंपरागत आंधळ्या रूढींच्या विरुद्ध होते. त्यामुळे घरात धार्मिक कर्मकाण्ड विधि होत नसत. चर्चा झालीच तर सुधारणेबाबत होत असे. मला भाऊ नव्हता. घरीच इस्टेट बरीच होती म्हणून त्यावेळच्या प्रथेप्रमाणे दत्तक घेण्याचा आग्रह लोक त्यांना करीत असत. त्यावर ते म्हणायचे, ‘हे माझे दोन वाघ (मी व माझी धाकटी बहीण) आहेत की! त्यांनाच मी मुलांप्रमाणे वाढवीन.’ आई माझी लवकरच वारली. पण पुन्हा लग्न न करता त्यांनी या मृत्यूकडे तटस्थ वृत्तीने पाहिले. आम्हाला सर्व तऱ्हेचे शिक्षण दिले, अगदी उत्तम स्वयंपाकापासून, सायकलवरून ३ मैलावरील शाळेत जाणे, पोहणे, मुलांच्यात, मित्रांच्यात नि:संकोच मिसळणे, हॉटेलमध्ये जाणे, रेल्वेने एकटे जाणे इत्यादी शिकवून धीट बनवले. गणितात पदवी मिळावी म्हणून पुण्याच्या कॉलेजच्या वसतीगृहात पाठवले, इत्यादी किती सांगू? आम्ही तेव्हा एम.सी. तही बसत नव्हतो. कुठेही आईची उणीव भासू दिली नाही. तेव्हाच्या काळात हे करणे धाडसाचे होते. तो त्यांच्यातील सुधारक व त्यानुसार वागण्याचे धैर्य मला जन्मभर शिकवतच राहिले.

माझ्या सुदैवाने सुशिक्षित, सुधारक, मनोश्रीमंत अशा एकत्र मराठ्यांच्या कुटुंबात लग्नानंतर मी आले. त्यानंतर इंजिनिअरींग शिक्षण, स्वतंत्र धंद्यातील काम, शैक्षणिक इन्स्टिट्यूटमध्ये शिकवणे, सरकारी परिक्षक म्हणून फिरणे, विद्यार्थ्यांकरता टेक्नीकल पुस्तके लिहिणे, एक मुलगी व एक मुलगा यांचे संगोपन करणे, त्यांना सुविद्य करणे यात वयाची ४२ वर्षे निघून गेली. श्री. मराठे यांचा स्वतंत्र व्यवसाय होता. परदेशातील (जर्मनी) एका कंपनीशी आमच्या कंपनीने कोलॅबोरेशन केले होते. त्या कामाचे शिक्षण व प्रॅक्टीस घेण्याकरीता मी जर्मनीत ४-५ महिने एका कुटुंबात राहिले होते. माझी होस्टेस मला एकदा म्हणाली ‘तुम्ही माझ्याकडे राहिलात ते बरं झालं!’ मी म्हटलं ‘का?’ तर म्हणते ‘मी जगातील बऱ्याच धर्माबद्दल थोडं थोडं वाचले आहे. पण जर्मन तत्त्ववेत्ता मॅक्सम्युलर याला ‘भगवद्‌गीता’ का आवडली? व तो एक जगातील सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे, असे तो का मानतो? ते तुम्ही मला समजावून सांगा.’ आता आली का पंचाईत! मी तिला स्पष्ट सांगितले ‘येवढा जगन्मान्य विद्वत्मान्य आपला ग्रंथ न वाचणारे आम्ही हिंदू लोक दळभद्री, करंटेच आहोत. आमच्या शाळा कॉलेजात कुठेही धर्मग्रंथाचे शिक्षण मिळत नाही व तुमच्याप्रमाणे दर रविवारी धर्मस्थळी जाऊन वाचण्याची पद्धत नाही. हा जीवन घडवणारा ग्रंथ काही लोक वेळ घालवण्याकरता म्हातारपणी वाचतात, हे दुर्दैव आहे.’

भारतात परत आल्यावर चौकशी केली. भगवद्‌गीता आपल्याला कोण शिकवील? ‘मुंबईतील एका मोठ्या मैदानावर स्वामी चिन्मयानंदांची भगवद्‌गीतेवर प्रवचने चालू आहेत.’ अशी माहिती मिळताच त्याच संध्याकाळी मी तिथे धावलेच! उत्तम इंग्रजीतून जे ओजस्वी शब्द त्या रुबाबदार तपस्वाच्या दैवी वाणीतून ऐकले, ते सरळ डोक्यांत घुसले, आणि हृदयात उतरले. त्यानंतर ती वाणी ऐकण्याचे वेडच लागले. आपल्या जीवनाशी थेट संबंधित विषय साध्या सोप्या भाषेत हसतखेळत सांगितलेले! त्या अभ्यासाची ओढच लागली. जीवनाला उन्नत करणारे ते शास्त्र किती वाचू अन् किती नको असे झाले. तेव्हाच श्री. मराठे बंधूचे अचानक देहावसान झाल्याने घरातल्या व ऑफिसच्या (Principal of REI & Managing Director of Factory) जबाबदाऱ्या सांभाळणे, भाग पडले. त्यातच मुलांची शिक्षणे, लग्न, बाळंतपणे इत्यादी करताना खूप वाचायला जमले नाही. त्यातून थोडी रिकामी झाल्यावर मात्र गुरुदेवांची मुंबईतील व बाहेरगावाच्याही खूप शिबिरांना उपस्थित राहिले. हिंदुस्थानभर व परदेशातही! परदेशात त्यांच्याबरोबर जायला मिळाले! मग ते व्यसनच लागले! आमच्या विभागात अभ्यासवर्ग घेणे, गीता ज्ञानसत्रांचे आयोजन करणे, यात भाग घेत असे. मग मी पवईच्या चिन्मय सांदिपनी आश्रमात कधी कधी जाऊन राहू लागले. असेच एकदा मी तिथे राहिले असताना गुरुदेव मला म्हणाले, ‘आता तुम्ही इथेच रहा. (now you stay here only)’ त्यापूर्वी गुरुदेव आमच्या घरी एकदा भिक्षेला

(भोजनाकरता) आले होते तेव्हा त्यांनी आमच्या विद्यार्थ्यांना उद्देशून एक छोटे भाषणही केले होते. माझी आर्थिक परिस्थिती, मुलेबाळे यांचे सुरळीत जीवन त्यांच्या नजरेतून सुटले नव्हते. आता मला घरी अगर ऑफिसमध्ये राहण्याची गरज नाही, कारण दोन्ही मुले धंदा व इन्स्टिट्यूट छान सांभाळत होते, हे मला समजले नसले तरी त्यांना समजले होते. इतरही अनेक संस्थात मी काम करत होते. ते सर्व हळुहळु बंद करून मी पवईच्या आश्रमात २ वर्षाचा वेदान्त कोर्स करायला गेले. तिथे स्वामी तेजोमयानन्दासारखे शिक्षक मिळाले. वेदान्त तत्वज्ञानाचे (गीता, उपनिषदे इत्यादी) उत्तम शिक्षण मिळाले आणि जीवनाचे ध्येय समजले. त्याबरोबरच मिशनची शिस्त आवडली आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोनच बदलला. उत्तम व्यक्तिमत्त्व म्हणजे नुसती बुद्धीची वाढ नसून, आध्यात्मिक उन्नतीचा त्यात केवढा भाग आहे ते कळले. रागद्वेषादि विकार हळुहळु कसे कमी करावे? ते समजले व इतर लोकांशी व्यावहारिक वर्तणूक बदलली. पाटी कोरी करून कसे व्यवहार करावे? हे लक्षात आले. गुरुदेवांच्या शिकवण्याचे चिंतन, मनन करायला वेळ व संधी मिळाली. त्यामुळे नंतर गुरुदेवांच्या दोन इंग्रजी पुस्तकांचे मराठी भाषांतर करताना अवघड गेले नाही. 'Better late than never' हेच खरे! स्वामी विवेकानंद म्हणत 'परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते तर संन्याशाच्या अमृतवाणीने जीवनाचे सोने होऊ शकते.' अगदी तंतोतंत पटले हे बोल.

१९८६-८७ साली पवई आश्रमातील दोन वर्षाचा निवासी वेदान्त कोर्स केला. तिथे राहून तेव्हा उपनिषदे, गीता व इतर ग्रंथ सविस्तर ऐकायला मिळाले, तेव्हा थोडे समाधान झाले. आश्रमातील वातावरणांत मी अगदी बुडून गेले. गुरुदेवांच्या विचारात रममाण होण्याची संधी मिळाली. त्यांच्याच दोन इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद केल्यामुळे चिंतन झाले. चिन्मय मिशनच्या अनेक कामांत भाग घेताना अत्यंत मोठे पदाधिकारी, मोठे धनिक, अहंकार विसरून एक दिलाने कुठलेही छोटी मोठी कामे आपल्या गुरुच्या भक्तीमुळे किती एकजुटीने तनमनधन ओतून करतात, हे जवळून अनुभवायला मिळाले. त्यामुळे मनाचा विस्तार झाला व छोट्या छोट्या तक्रारी आपण बाजूला सारायला शिकतो. आपले छोटे कुटुंब विस्तारते. त्याआधी मी इतर अनेक संस्थात काम करीत होते. President, Indian Technical Education Society म्हणून १० वर्षे काम केले. महाराष्ट्र गव्हर्नमेंट तर्फे प्रॅक्टीकल Examiner (For Radio TV Exams) म्हणून अनेक ठिखाणी जात होते. ITES करता अशीच दक्षिण हिंदुस्तानात फिरले. विवेकानंद केंद्राचा २० दिवसांचा योग वर्ग केला, इत्यादी.

नंतर आश्रमात असताना मी एकदा गुरुदेवांना म्हटले 'मला सारखे तुमच्या सहवासात राहावेसे वाटते.' तेव्हा म्हणाले 'Then you will have to be on wheels' (तर तुला सतत पळतच राहावे लागेल.) बोल, अमेरिकेला येतेस. मी म्हटले 'मागच्याच वर्षी मी इंग्लंड (U.K.), अमेरिका असा ३ महिन्यांचा दौरा करून आले आहे. (I can't afford a second trip) मला दुसरी ट्रीप परवडणार नाही. मग हाँगकाँग, मनीला, सिंगापूर अशा छोट्या ट्रीपला मी व स्वामिनी गयानन्दा गुरुदेवांबरोबर गेलो. मोठ्या उत्तुंग माणसांच्या सहवासात आपणही त्या काळात उंचावतो. ही मोठी माणसे आपले व्यक्तीमत्व विसरून कसे सहज वागतात याचे अनेक अनुभव मिळाले.

विमातळावर स्वामिजी व्ही.आय.पी. गेट मधून आमच्या अगोदर बाहेर पडत असत. एके ठिकाणी आम्ही बाहेर येऊन पाहतो तो स्वामिजी सामानाच्या धावपट्ट्याजवळ उभे राहून सर्व सामान गोळा करीत होते. आम्हाला अगदी लाजल्यासारखे झाले. त्यांच्या सहवासात प्रकृतीही छान राहते असा अनुभव. पहाटे लवकर उठून आंघोळ, तिन्ही त्रिकाळ त्यांच्याबरोबर जेवायला जाऊन निरनिराळे पदार्थ खाणे हे माझ्या नाजुक प्रकृतीला न झेपणारे होते. पण तेच सर्व काळजी वाहतात अशी पक्की खात्री, तेव्हाच नव्हे, तर इतरही अनेक वेळा अनेक ठिकाणी प्रत्ययाला आली.

हिमाचल प्रदेशामध्ये सिद्धबारी येथे एका सुंदर टेकडीवर चिन्मय मिशनचा सुरेख आश्रम आहे. गुरुकृपेने तिथे मला खूप वेळा जाऊन राहता आले. एकदा तर ५ महिने राहण्याची संधी मिळाली. सिद्धबारी तपोवनातील ते ध्यानमंदिर, गुलाबांचा बगीचा, वनवासी रामसीतेचे ते सुंदर मंदीर व नजर खिळवणाऱ्या त्या वनवासी रामसीतेच्या शांतव प्रसन्न मूर्ती. सर्वच काही अवर्णनीय आहे. संताच्या वास्तव्याने पुनीत झालेला, सतत हिमालयाचे दर्शन देणारा तो परिसर आयुष्यात बरेच काही देऊन गेला. माझ्या दीर्घायुष्याची किल्ली हीच असावी असे आता वाटते. माझे आदरणीय शिक्षक स्वामी सुबोधानंदानी आपल्या सखोल चिंतनात्मक प्रवचनाची अगदी उपनिषदाच्या गाभ्यात नेले. मनन चिंतनाची संधी मिळाली, त्यामुळे मन क्षुद्र गोष्टींनी कमी विस्कळीत होऊ लागले.

त्या तपोभूमीमध्ये दर रविवारी सकाळी भगवान रामरायाच्या साक्षीने देवळाबाहेरच्या अंगणातं गायत्री होम होत असे. आश्रमातील झाडून सारी माणसे तिथे उपस्थित राहात. प्रत्येकाला आहुती टाकण्यास संधी मिळे. ''ॐ भू: भुव: स्व:'' ह्या मंत्राचा वातावरणात घुमणारा तो संघटित घोष. आठवण झाली की अजूनही कानात निनादतो. 'अिदं न मन' हे मंत्रवाक्य हृदयात ठसवण्यासाठी दर रविवारी १०८ वेळा ऐकवले जायचे. जणू काय ती होमदेवता सांगत होती 'अनंत जन्माच्या साठवलेल्या वासनांची तू आहुती दे आणि मोकळी हो'

मधेच केव्हातरी गुरुदेवांचे आगमन व्हायचं. आश्रमांत नवचैतन्याचा संचार व्हायचा. गुरुदेव म्हणजे सळसळणाऱ्या चैतन्याचे मूर्तीमंत दर्शन. ऐकलेले असायचे की 'मागच्या आठवड्यात त्यांची तब्बेत बरी नव्हती हॉस्पीटलमध्ये होते. पण त्यांना प्रत्यक्ष पाहिल्यानंतर. आल्या आल्या गाडीतून उतरताच तोच खणखणीत आवाज, उत्साह, सगळ्यांची विचारपूस, थट्टा, विनोद - प्रवासाच्या त्रासाचा मागमूसही नाही. आजारांना जिंकणारा तो महामानव कुठल्याही रोगांची काय हिंमत आहे त्यांना त्रास देण्याची? 'वैदिक तत्वज्ञान कसे जगावे' याचे ते चालते बोलते प्रतीक - त्याचा परिणाम होऊन एखाद्याचे जीवन बदलले नाही तर त्याचे ते दुर्भाग्य.

सिद्धबारीला असताना एकदा गुरुदेवांचे आफ्रिकेतून मला पत्र आले. माझ्या कुठल्याही पत्राचे ते उत्तर नव्हते. अनपेक्षित पत्र आल्याने मी

जितकी आनंदीत झाले की माझ्यासाठी उलटलेले वय विसरून लहान मुलीसारखी जिकडे तिकडे बाहेर फिरले. सर्वांना पत्र दाखवले. त्यात इतर मजकुराबरोबर त्यांनी लिहिले होते 'आता प्रचार कार्यात आयुष्य घालवावे. आजूबाजूला लोकांना जमवून छोटे छोटे वर्ग घ्यावेत व उत्तम माणूस घडवणाऱ्या आपल्या दैवी तत्वज्ञानाची महती लोकांना पटवून द्यावी.'

त्यानंतर मी पुण्याला माझ्या छोट्याश्या बंगलीत राहायचे ठरवले व आजूबाजूला जाऊन तत्वज्ञानाचे वर्ग घेऊ लागले. आमचा तो भाग साधारण मध्यमवर्गीय सुशिक्षितांचा होता. त्यामुळे जम बसायला वेळ लागला नाही. गुरुदेवच सर्व व्यवस्था करतात याचा प्रत्यय आला. आनंदपार्क या भागात एकदा संपूर्ण गीता विस्तृतपणे शिकवली. १८ महिने लागले. सांगता समारंभाला आशिर्वाद द्यायला स्वामी पुरुषोत्तमानंद आले होते व पुढील कार्याची दिशा देऊन गेले. निरनिराळ्या ठिकाणी वेदान्ताची छोटी मोठी पुस्तके घेत होते. लहान मुलांचा बालविहार (संस्कारवर्ग) आमच्याच घरातील माडीवर (त्याकरता मजला चढवला व तिथे फक्त हॉलच केला) घेत होतो. आमच्या चिन्मयमिशनच्या अनेक प्रचारकांची प्रवचने सत्रे आयेजित केली. अजूनही मुंबईत तेच करते आहे. गुरुदेवांचे कार्य यथाशक्ती, यथामती करीत असताना आयुष्य उत्तम गेले व जाणार आहे.

आध्यात्मिक लिखाणही चालू आहे. आताच श्रीमद्भगवतगीतेवरील पू.श्री. मामा अभ्यंकर यांचे चिंतनात्मक लिखाणाचा मराठी अनुवाद पूर्ण केला. त्यांचे D.T.P. २५० पानांचे झाले आहे. गुरुदेवांचे एक वचन फार वर्षापासून हृदयावर कोरलेले आहे. (Do your best and leave to him/the rest) तुम्ही आपले सर्वस्व पणाला लावून प्रयत्न करा आणि बाकी सर्व त्या भगवंतावर सोपवा. त्यामुळे कधी चिंताग्रस्त व्हायला झाले नाहीव अजूनही होत नाही. (Live in the Present) वर्तमानकाळात जगा हा उपदेश मनात बिंबवल्याने श्री. मराठे यांचे अकाली अचानक निधन झाल्यावर ते दुःख बाजूला सारून धंद्याच्या व घरच्या सर्व जबाबदाऱ्या उत्तम तऱ्हेने पार पाडू शकले. ते करत असताना काही माणसाबद्दलचे पूर्वीचे अनाठाई असलेले द्वेष मत्सर गुरुदेवांच्या शिकवणुकीमुळे काही मनांतच राहीनासे झाले व त्यामुळे व्यवहारातले संबंध सुधारले. त्याचा मला नेहमीच खूप फायदा झाला. पण गुरुदेव सर्वकाळी सुखरूपपणे तारून नेतात याबद्दल प्रचंड श्रद्धा आहे. त्यामुळे या वयातही अजून मिशनच्या शिबिरांना (७ दिवसांच्या) उपस्थित राहून सर्व कार्यक्रमात भाग घेते. गेले ५-६ वर्षे आता मी मुंबईत आहे. 'आता या वयात पुण्यात एकटे रहायचे नाही' असे मुले म्हणतात. सुजाण, प्रेमळ मुलांचे का नाही ऐकायचे. साधना घरात होत नाही अशी तक्रार करणाऱ्या एक व्यक्तीला गुरुदेवांनी एकदा उपदेश केला होता 'make your home an Ashram' म्हणजे घरी राहूनच इतर माणसामध्ये फार न गुरफटता अनावश्यक सल्ले न देता शांतपणे राहावे आणि साधनेत व्यग्र असावे. तसे करायचा प्रयत्न चालला आहे. इथेही वर्ग घेते. आमच्या घरी वर्षातून एकादशी, श्रावणी सोमवार, नवरात्र व इतरही असे अनेक उत्सव आमच्या घरी अगर बाहेर साजरे केले जातात. इथेही तीन वर्षापूर्वीपर्यंत चिन्मय मिशनची प्रवचने सत्रे आयेजित करीत होते. माझ्या ८० वर्षाच्या निमित्ताने ब्राह्मणसभेत ८ दिवस भागवत सोहळ्याचे आयोजन केले होते. ७५ व्या वर्षीच्या सोहळ्यात प.पू. सातारकर महाराज यांचे कीर्तनाचे आयोजन झाले. पण ते सर्व मुलांनी केले.

आता एक छान, गोजिरवाणा पणतू झालाय.

असे किती म्हणून सांगू? सांगणे फार अवघड आहे. अगदी 'अनंतहस्ते कमलावराने घेशील देता किती दो कराने' अशी अवस्था आहे. मुलाबाळांच्यात, आनंदात दिवस चालले आहेत. 'आपण भगवंताला विसरलो तरी तो आपल्याला विसरत नाही' या विचारावर पूर्ण श्रद्धा आहे. भगवंताच्या व गुरुदेवांच्या कृपेने ही श्रद्धा वाढो येवढीच प्रार्थना.

दैनंदिन प्रार्थना करीत असताना, एक श्लोक मी रोज म्हणते तो असा आहे.

अनायासेन मरणं विनादैन्येन जीवनम्।
प्रभो कृष्ण! कृपां देहि देहान्ते तव सन्निधम्।।

(अर्थ - अनायास (सुखाने) मरण यावे. माझे जीवन दैन्यवाणे नसावे. हे कृष्णा! एवढी कृपा कर की देहान्तानंतर तुझे सान्निध्य मला लाभू दे.

**- श्रीमती शालिनी मराठे**

*(पृष्ठ १ वरून)*

## संपादकीय

**नाही. तो असताना लेख छापला असता, त्याने वाचला असता तर त्याला त्याची निश्चितच अपूर्वाई होती. परंतु तो योग नव्हता याची मनाला हळहळ वाटते. 'ईश्वरेच्छा बलियसी दुसरे काय?'**

**श्री.यशवंत सुरेश मराठे यांचा स्फूर्तिदायक लेख आहे. त्याचप्रमाणे श्री.मोहन मराठे यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाल्यामुळे मराठे परिवाराला त्यांचा अभिमान वाटतो.**

**'मासानाम मार्गशीर्षोऽहम्' अशा मार्गशीर्ष महिन्यात हा अंक निघतो आहे. १ डिसेंबरला मार्गशीर्ष पौर्णिमेला श्रीदत्तजयंती आहे. म्हणून श्रीदत्तात्रेयांवरचा लेख आणि कविता छापली आहे.**

**सांगायला आनंद वाटतो की आपले कुलबांधव 'हितगुज'ची वाढीव वर्गणी पाठवून कर्तव्य पालन करत आहेत. 'हितगुज' राखीव फंड निधीमध्ये त्यांची नावे छापली आहेत. अनवधनाने नाव छापायचे राहून गेले असल्यास क्षमस्व.**

**लवकरच दि.२५ डिसेंबरला पुण्याच्या कार्यक्रमाला आपण भेटणार आहोत.**

**आपली शुभचिंतक,**
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
**(पृ. १२०)**
**संपादिका - हितगुज**
**दि. १८ नोव्हेंबर २००९**

◆◆◆

# यशस्वी जीवनाची सूत्रे

## लेखक - श्री. यशवंत सुरेश मराठे (पृ.३९९)

आजच्या युगात यशस्वी असण्याची व्याख्या म्हणजे खूप श्रीमंत / धनवान असणे अशीच केली जाते. आज आपल्या देशात जवळजवळ सर्वच राजकारणी आणि गुंड प्रवृत्तीचे लोक खूप श्रीमंत आहेत म्हणून त्यांना यशस्वी म्हणणे कितपत बरोबर आहे? ज्या मार्गाने संपत्ती कमावली जाते ते ही तितकेच महत्त्वाचे नाही का?

आपल्या समाजात आदर वाटाव्या अशाही अनेक व्यक्ती वेगवेगळ्या क्षेत्रात आहेत ज्या कदाचित खूप श्रीमंत नसतील म्हणून त्यांना अयशस्वी मानायचे का? बाबा आमटे, जयंत नारळीकर, रघूनाथ माशेलकर, अण्णा हजारे, मेधा पाटकर, अभय बंग वगैरे आदरणीय व्यक्ती अयशस्वी आहेत का? तसेच जे.आर.डी. टाटा, नारायण मूर्ती, अझीम प्रेमजी वगैरे व्यक्ती जितक्या श्रीमंत तितक्याच आदरणीय आहेत. तेव्हा आपण अशा व्यक्तींनी त्यांच्या जीवनात काय आणि कसे केले ह्याचा अभ्यास करणे जरुरीचे आहे. 'मरावे परि किर्तीरूपे उरावे' ही उक्ती मान्य केली तर अशा व्यक्तींच्या मार्गावर आपण चालू शकतो का हा विचार गरजेचा आहे.

असा अभ्यास केल्यावर माझ्या मते असे लक्षात आले की काही समान सूत्रे ह्या सर्व व्यक्तींनी कमी अधिक प्रमाणात अंगिकारली आणि जीवनात ते यशस्वी झाले.

**सूत्र १: 'आपल्यातील बलस्थाने ओळखणे'**

आपल्याला लहानपणापासून आपल्यातील कमतरतेवर मात करायला सांगितले जाते.

इथे एका सश्याची काल्पनिक कथा आठवते. एक ससा एका सश्यांच्या शाळेत शिकत होता. इतर सर्व सश्यांप्रमाणे त्याला चांगली उडी मारता येत असे. वर्षाच्या शेवटी त्याला उडी मारण्यामध्ये चांगले गुण मिळाले परंतु तो पोहोण्यात नापास झाला. त्याचे पालक काळजी करू लागले. त्यांनी त्या सश्याला सांगितले की उडी मारणे विसर, ते तुला येतेच. तू पोहोण्यावर लक्ष केंद्रित कर. त्यांनी त्याला पोहोण्याच्या क्लासला पाठवले. आणि कल्पना आहे एक वर्षाने काय झालं? तो ससा उडी मारण्याचे विसरला. आता पोहोण्याचा विचार केला तर आपण कधी पोहोणारा ससा बघितला आहे का?

त्यामुळे आपल्यात काय कमी आहे हे कळणे जरी कितीही महत्त्वाचे असले तरी आपल्यातील बलस्थाने ओळखणे त्याहूनही महत्त्वाचे आहे. याचे कारण आपल्यातील बलस्थानेच आपल्याला शक्ती देतात. ज्यायोगे आपण कमतरतेवर मात करू शकतो.

**सूत्र २: 'दहा रुपये कमावणे हे शंभर रुपये मिळण्यापेक्षा अथवा सापडण्यापेक्षा खूप महत्त्वाचे आहे'**

ऐका गावातील सावकार आपल्या वयात आलेल्या मुलाला रोज दहा रुपये कमवून आणायला सांगायचा. त्या मुलाला ह्याचा खूप कमीपणा वाटत असे त्यामुळे तो गावातील कोणा ना कोण्या व्यक्तीकडून दहा रुपये उसने घेऊन वडीलांसमोर जात असे. वडील त्याला ते मागच्या विहिरीत टाकून दे असे सांगत आणि त्याप्रमाणे तो करत असे. खूप दिवस गेल्यानंतर त्या मुलाला कोणी ऊसने द्यायला तयार होईना तेव्हां एके दिवशी त्याने खरंच काम करून पैसे कमविले आणि वडीलांसमोर ठेवले. त्यांनी नेहमीप्रमाणेच विहिरीत टाकून दे असे सांगितले तेव्हा तो मुलगा म्हणाला की हे माझे स्व:कष्टाचे पैसे आहेत आणि जे टाकणे मला शक्य होणार नाही. तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला सांगितले की अशीच भावना तू जेव्हा वडिलोपार्जित संपत्तीसाठी ठेवशील तेव्हाच तुला त्याची खरी किंमत कळेल.

स्वत: कमविण्याचा आनंद हा इतर सर्व गोष्टींपेक्षा खूप मोठा आहे. आपल्याकडे असलेल्या गोष्टींची खरी किंमत ती आपण स्वत: कष्ट करून कमावलेली असली तरच कळते.

**सूत्र ३: 'प्रत्येक वेळी यश मिळेल ह्याची खात्री नसते'**

यश हे नक्कीच सुखावह असते परंतु त्याचा गर्व होऊ देता उपयोगी नाही. ज्या क्षणी असे घडेल तेव्हा आपण अपयशाच्या दिशेने पहिले पाऊल उचलतो. जीवनात हार-जीत कायम होत असते. क्रिकेटमधील सर्वोत्तम फलंदाज डॉन ब्रॅडमन, ब्रायन लारा, सचिन तेंडूलकर देखील प्रत्येक डावात शतक काढू शकत नाहीत.

जेव्हा कधी अपयशाचा सामना करावा लागेल तेव्हा यशाप्रमाणेच ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे असे मानावे. स्वत:ला किंवा दुसऱ्यांना दोष देण्यात काहीच अर्थ नसतो. त्या अपयशाचा स्वीकार करावा. कारण ज्यायोगे आपण आत्मपरिक्षण करून पुढे जाऊ शकतो.

**सूत्र ४: 'केवळ उच्च शिक्षणाचा उपयोग नाही.'**

उच्च शिक्षण हे जगाच्या बाजारात केवळ पहिल्या दरवाज्याच्या किल्लीसारखं असते, कारण एकदा दारातून आत शिरलं की रोजच नव्याने शिकावं लागते आणि तिथे शाळा-कॉलेजात शिकलेलं विशेष उपयोगी नसतं. या ठिकाणी अपार कष्ट घ्यायची तयारी आणि जिद्द असणे खूप महत्त्वाचे असते.

हाताखालच्या माणसांना जरूर तेव्हा कडक शब्दात ओरडणे आणि शिक्षा करणे कधीकधी आवश्यक असते; पण नंतर माणूस म्हणून त्याच्याशी संवाद साधून त्याचे मनोधैर्य वाढवायची संधी शोधत रहाणे तितकंच महत्त्वाचे असते.

**सूत्र ५: 'अंगी लीनता / नम्रता वाणविणे'**

कधी कधी आयुष्यात खूप काही मिळाल्यानंतर असे वाटते की इतकं मिळण्याकरिता आपण खरंच लायक आहोत का? अशा वेळी आपल्यात कृतज्ञता असणे खूप महत्त्वाचे आहे. आयुष्यात आपल्या आई-वडिलांकडून, शिक्षकांकडून, वडिलधाऱ्या व्यक्तींकडून इतके काही मिळालेले असते की जे ऋण आपल्याला कधीच फेडता येणार नाही. या जगात परिपूर्ण असे कोणीच नाही पण आपल्याला जे मिळाले आहे त्याची दखल घेणे गरजेचे आहे. आयुष्यात कुठचीच गोष्ट कायमस्वरुपी नाही हे नेहमी लक्षात ठेवायला हवे.

**सूत्र ६ : 'सर्वोत्तम करण्याचा अट्टाहास'**

आपण आपल्या आयुष्यात जे जे करू ते सर्वोत्तम करण्यासाठी अथक परिश्रम घेतले पाहिजेत. एक मार्ग म्हणजे आपल्यापेक्षा चांगले असलेल्या इतरांकडून शिकणे; ते काय वेगळे करतात याचा सतत मागोवा घेणे आणि त्याचे अनुकरण करणे. परंतु ही गोष्ट बाहेरून लादता येत नाही. त्याची गरज आपल्याला आंतरिक देखील वाटायला हवी; त्याचा ध्यास लागायला हवा. ती एक क्रिया न राहता त्याची सवय व्हायला हवी. आपली बुद्धीच नव्हे तर आपले तन आणि मन देखील समरस व्हायला हवे.

**सूत्र ७ : 'कधीही हार न मानणे'**

अपयश / दु:ख हे नेहमीच न सांगता अचानकपणे आपल्यासमोर उभे ठाकते. एक तर आपण हात वर करून हार मानू शकतो अथवा स्वत:चे दु:ख गोंजारत बसू शकतो वा आलेल्या परिस्थितीला धैर्याने तोंड देऊ शकतो.

आगीतून तावून, सुखावून निघाल्याशिवाय सोन्याला कधीच झळाळी येत नाही.

**सूत्र ८ : 'आपल्या मूल्यांशी कधीही तडजोड करू नये'**

आपण बदल स्वीकारायला हवे हे जरी खरं असले तरी आपल्या मूल्यांशी कधीही तडजोड करता कामा नये. आपल्या आयुष्याची मूल्ये आपल्यालाच ठरवावी लागतात आणि ही मूल्ये ठरवणे फार कठीण नाही. सचोटी, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता, समजूतदारपणा ही मूल्ये पिढ्यांनपिढ्या टिकून राहिली आहेत; परंतु मूल्ये हे केवळ शब्द नसून त्याप्रमाणे वागणे अभिप्रेत आहे.

आयुष्याच्या शेवटी माणसाच्या साध्यापेक्षा त्याच्या मूल्यांमुळेच त्याची ओळख शिल्लक रहाते.

**सूत्र ९ : 'प्रतिक्रिये ऐवजी प्रतिसाद द्यायला शिकावे'**

जेव्हा आपण प्रतिसाद देतो तेव्हा आपण शांत मनाने गोष्टींचे मूल्यमापन करून योग्य निर्णय घेतो; आपली कृती आपल्या नियंत्रणात रहाते. आपण जेव्हा प्रतिक्रिया देतो तेव्हा बऱ्याच वेळा आपण समोरच्या व्यक्तीला हवे तसेच आपण वागत असतो.

शेवटी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की आपल्याला नापास करायची शक्ती फक्त एका व्यक्तीत आहे; आणि ती व्यक्ती म्हणमजे आपण स्वत:! जो स्वत:ला नापास करतो त्याला जगात कोणीही पास करत नाही; परंतु जो यशस्वी व्हायचे ठरवतो आणि त्यासाठी सर्वस्व झोकून देतो त्याला थांबवेल असे कोणीही नाही. ज्याची स्पर्धा स्वत:शीच आहे त्याला कोण जिंकणार?

◆◆◆


**खापरपणजी सौ. गौरी शिवराम मराठे**

यांच्या स्मरणार्थ

**सीए प्रभाकर दामोदर मराठे (पृ.१२०)**

वडाळा, मुंबई-४०००३१

सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९

ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com


# निसर्ग

एकही 'कॅज्युअल लीव्ह' न घेता सुप्रभाती हजेरी लावतो,
खरोखरच थोर आहे सूर्यनारायण तो,
ऊर्जा देवतेच्या कोवळ्या किरणांनी, कळ्या उमलती,
जरी बकुळ सुकली, तरी सुगंध वारा पसरवी आसमंती ।।१।।

प्रखर उन्हाने धरिती तापली,
पाणी तापून वाफ जाहली,
हा अवखळ निसर्ग मग नभी तरंगतो,
अन् धुवांधार खाली कोसळतो।।२।।

या धारा धरणीमातेला तृप्त करतात,
मऊ मऊ कुशीत तिच्या कोंब रूजतात,
या प्रत्येक कोंबाचा होतो वृक्ष प्रचंड,
सावलीच देतो थकल्या वाटसरूंना अखंड।।३।।

एकेदिनी फांदीवर विणते खोपा कोणी सुगरण,
जाता येता करते आतील अंड्याचे रक्षण,
चिमुकल्या चोचीनं धडका मारीत आतून,
पक्षिणीचं इवलंसं पिल्लू येते बाहेर कवच फोडन ।।४।।

हा हा म्हणता चिमुकल्यास पंख फुटूनी,
उंच भरारी घेई ते विशाल गगनी,
हे नभ तर आहे अति भव्य,
रातीच्या अनंत तारका दिसती खूपच दिव्य।।५।।

चंदामामा लहानमोठा होतच असतो,
पृथ्वीवरी भरती ओहोटीला साद घालतो,
रात्रीच्या सुखद शीतल चांदण्यात,
कुंपणी रातराणी उमलते दिमाखात।।६।।

अशा या काळोख्या रजनीशी कुठले नाते,
ठाऊक मुळी अजिबात दिवसाला नसते,
तरी हे सुंदर गूढ निसर्गचक्र चालूच राहते,
कोणाच्या बरं हाती त्याची दोरी असते?।।७।।

असा हा नम्र निसर्ग आहे आदर्श शिक्षक,
नमन त्याला करू या होऊन नतमस्तक,
कारण तोच आहे शिल्पकार, निर्माता असाधारण,
म्हणूनच थांबवू या हे दुष्ट हानिकार प्रदूषण।।८।।


**कवयित्री - श्यामला पुरंदरे (जाईल)**
२७ब, वृंदावन सोसायटी, पंचवटी,
पाषाण, पुणे-४११००८
दूरध्वनी - (०२०)२५८९८५३४
मोबाईल - ९४२२ ५२१७२४


●◉◆●◉◆

# संभावित फसवणूक

## लेखक - श्री. अ.द. मराठे

आम्हाला जुना फ्रीज काढून नवीन घ्यायचा होता. आम्ही दुकानांत गेलो आणि चौकशी सुरु केली. दुकानदाराने जुन्या फ्रीजची तक्रार काय म्हणून विचारले, ''फ्रीज सुरु केला की फाडकन् ठिणगी पडत फ्यूज उडतो. कॉंप्रेसर गेला आहे असे सांगितले.'' माझे हे उत्तर ऐकून त्याने जुन्या फ्रीजचे सातशे रुपये द्यायचे कबूल केले. माझ्या बायकोने ती रक्कम अमान्य करून बाराशे रुपयांची मागणी केली. मग फ्रीजचा आकार, जुनेपणा यांची चर्चा होऊन हजार रुपयांवर तोड निघाली. आम्ही नवा फ्रीज पसंत केला. त्याच्याहि किंमतीत थोडी घासाघीस झालीच. आम्ही पैसे रोख दिले आणि त्याच दिवशी फ्रीज काही घरी आला नाही. रात्रीचे साडेआठ वाजले. आता दुकान बंद झाले असणार, आता कसला फ्रीज येतो म्हणून आम्ही गप्प बसलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहाला जाऊन विचारले त्यावर तो मालक हातावर प्रसाद म्हणून पेढ्याचा लहानसा तुकडा ठेवत म्हणाला, ''तुमचा जुना फ्रीज ठेवायला गोडाऊनमध्ये जागा नाही. म्हणून नाही पाठवला. आज नक्की पाठवतो.'' पुन्हा दिवसभर वाट पाहिली. रात्री साडेआठ झाले तरी फ्रीजचा पत्ता नाही. आजहि तो येणार नाही हे उघडच होते. आम्ही जेवत असतांना सव्वा नऊला घंटा वाजली. दार उघडतो तर दारांत फ्रीज घेऊन हमाल उभा! ताटं बाजूला सारून स्वयंपाक घरात जागा केली. त्या हमालाच्या मदतीने जुना फ्रीज बाहेरच्या खोलीत आणला. नवा जागेवर बसवला. हमालानेंच सराइतपणे आतील सर्व कप्पे लावून दिले आणि फ्रीज सुरु केला. एवढ्यात बायकोच्या लक्षात आले की फ्रीज आतून पूर्ण ओला आहे. तिने हमालाला विचारले, तो म्हणाला, 'मला काय माहिती?' मग आमच्या लक्षात आले की फ्रीज त्याच्या बॅकबंद खोक्यातून न येता उघडाच आला होता. हमाल म्हणाला, ''मला काय ठाऊक तुमचे व्यवहार? मला तुमचा पत्ता दिला आणि माल दाखवून पोचवायला सांगितले.'' आम्ही म्हणालो 'फ्रीज घेत नाही. तो असाच परत घेऊन जा.' हमाल म्हणाला, 'मी नेऊन कुठे ठेऊ? मालक दुकान बंद करून गेला सुद्धा. जातां जातां मला पोचवायला सांगितले.'

मी त्याच्याकडे डिलिव्हरी व्हाऊचर मागितले. पण त्याच्याजवळ ते नव्हते. त्याचा काय दोष असे म्हणून आम्ही त्याला जाताना जुना फ्रीज घेऊन जायला सांगितले. ''मी आता माझ्या घरी जाणार. मी कुठे हे घेऊन जाऊ? आता दुकानहि बंद झाले मी बोललो ना.''

आम्ही गप्प बसलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मी दुकानाकडे निघालो तोच लक्षात आले की आज बुधवार. आमच्याबाजूची सर्व दुकाने बंद. गुरुवार शुक्रवार आम्ही लग्नासाठी बाहेर गेलो होतो. शनिवारी दुकानदाराकडे गेलो. त्याने सर्व ऐकून घेतले आणि विचारले, 'डिलिव्हरी करायला कोण आला होता?' 'आम्हाला काय माहित?' माणूस तुम्ही पाठवला होता.' मग त्या माणसाला शोधण्यात, इतर माणसांना बोलावून त्यांच्याशी आम्हाल अगम्य भाषेत बोलत अर्धा पाऊण तास गेला. मग मालक म्हणाला, ''आम्ही ट्रायल घेऊन फ्रीज पाठवला म्हणून तो ओला होता आणी त्याचा कार्टन आणि थर्मोकॉलचे पॅकिंग त्यांचा तुम्हाला काय उपयोग? तुम्ही ते कचरापेटीतच टाकणार ना? आम्ही ते कंपनीला परत पाठवतो. कंपनी पण त्याचा रीयुज करते.''

''आम्ही डिलिव्हरी व्हाऊचरवर सही केलेली नाही. आम्ही कंपनीकडे तक्रार करू.'' माझी बायको म्हणाली.

''मी डिलिव्हरी व्हाऊचर पाठवलच नाही. तुम्ही दुकानातच त्याच्यावर सही केली. आता ही गॅरंटी घेऊन जा. काहीही कंप्लेंट आली तरी आम्ही फ्री सर्विस देऊ. आम्ही काही लबाडी केली नाही आणि करणार पण नाही.''

''तो जुना फ्रीज कधी नेणार? घरात त्याची अडचण होते.'' मी म्हणालो. ''गोडाऊनमध्ये जागा नाही. तुम्हाला नवा फ्रीज आधी हवा म्हणून पाठवला. आम्ही असा व्यवहार करीत नाही. जुन्याचे पैसे आधीच दिले ना तुम्हाला? आता उद्या हमाल पाठवतो.''

आम्ही घरी आलो. पुढले आठ दिवस दररोज दुकानात फेऱ्या मारून जुना फ्रीज कधी नेणार हेच विचारीत होतो. शेवटी आम्हीच कंटाळून जाईनासे झालो. दहाव्या दिवशी दुपारी एक माणूस जुना फ्रीज न्यायला आला. त्याला बघून मला आश्चर्यच वाटले. त्याचे जुने फ्रीज नवे करून विकण्याचे दुकान माझ्या कार्यालयात जाण्याच्या वाटेवरच होते. त्यालाच मी जुन्या फ्रीजची तक्रार सांगून काय झाले विचारले होते. कॉंप्रेसर गेल्याचे त्यानेच मला सांगितले. मी विचारले, 'यायला इतका उशीर का केलात? या लहान जागेत आम्ही पंधरा दिवस अडचणीत काढले.'

तो म्हणाला, ''उशिर कुठे केला? मला आज सकाळी निरोप आला आणि मी दुपारी आलो. जुने फ्रीज तो मलाच विकतो.''


मी विचारले, 'हा तुम्ही कितीला घेतला?'

'पंधराशे. तुम्हाला त्याने चौदाशे दिले ना?' मी गप्प बसलो. फ्रीजच्या दुकानदाराने आम्हाला प्रत्येक पायरीवर फसवले होते.

माझ्या घरातून खालच्या बिऱ्हाडकरूच्या घरात पाणी गळत होते. त्यावरून वादावादी, भांडाभांडी इ. होऊन अर्धा अर्धा खर्च करण्याची तडजोड झाली. मग चौकशा करून आम्ही तज्ज्ञ माणूस बोलावला. त्याने माझ्या संडासाच्या पॉटला तडा गेला आहे, कोंबडा फुटला आहे इ. सांगून पॉट बदलायला सांगितले. खर्च कमी यायला लहान पॉट बसवायचा सल्ला दिला. 'जुने पॉट काढायचे म्हणजे सर्व फरशा तोडून नवीन बसवाव्या लागतील. त्या बावीस लागतील, पण आम्ही पंचवीसचा हिशोबकरतो. उरल्या तर तीन फरशा तुम्ही ठेवून घ्या. गळती थांबली नाही तर पुन्हा फ्री दुरुस्ती करु.' आम्ही अर्थातच मान्य केले.

आठ दिवस झाले तरी गळणे काही पूर्ण बंद झाले नाही. दुरुस्तीवाल्याला विचारले तर तो म्हणाला, 'पहिली ओळ सुकायला थोडा वेळ

*(पृष्ठ ९ वर)*



**लेखक श्री. गजाननराव मराठे आणि त्यांचे सासरे श्री.पंढरीनाथ पाटणकर 'माझी माणसे' या पुस्तकाचे प्रकाशन करताना**

दि. ३१.८.२००९ रोजी सेवानिवृत्त झाले. त्या निमीत्त मी लिहिलेल्या 'माझी माणसे' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ व मराठे कुटुंबियांचे स्नेहसंमेलन दि. ३०.८.०९ रोजी ज्ञानेश मंगल कार्यालयात आयोजीत करण्यात आले. वरील कार्यक्रमास संपूर्ण मराठे परिवार, पाटणकर जोशी बर्वे व साने परिवार व इतर नातेवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. मिलिंद मराठे यांनी केले तसेच त्यांनी गजाननरावांची मुलाखत पण घेतली. पुस्तकाचे प्रकाशन त्यांचे सासरे श्री. पंढरीनाथ पाटणकर यांच्या हस्ते झाले. वरील कार्यक्रमास त्यांचे काका श्री. सुधाकर मराठे व काकू त्यांना आर्शीवाद देण्याकरता उपस्थित होते. तसेच मराठे प्रतिष्ठानचे ट्रस्टी श्री. सतीश मराठे आपल्या परिवारासह उपस्थित होते.

पुस्तक प्रकाशन समारंभानंतर जेवणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमा नंतर मराठे परिवाराचा खालील व्यक्तींचा मराठे परिवाराकडून सत्कार करण्यात आला.

१) श्री. सुधाकर मराठे व त्याच्या पत्नी सौ. प्रतिभा मराठे यांच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाली व सुधाकर मराठे यांच्या वयाची ८० पूर्ण.
२) माझी आई श्रीमती सुशीला चिं. मराठे यांच्या वयाला ८० पूर्ण झाली.
३) गजाननरावांची काकू श्रीमती आशा चं. मराठे यांच्या वयाला ७० पूर्ण झाली.
४) मराठ्याचे जावई श्री. विनोद जोशी यांना ठाणे जनता सहकारी बँकेत अधिकारी या पदावर नेमणूक झाली म्हणून.
५) मा. मिलिंद मराठे याचा अध्यक्ष अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या जागेवर नेमणूक झाली.
६) गजाननरावांचा भाचा श्री. कणाद सदाशिव कुलकर्णी यांचा लंडन येथे उच्चशिक्षणाकरता निवड झाली.
७) गजाननराव यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण केली. तसेच नोकरीतील ४० वर्षे अधिकारी म्हणून निवृत्त तसेच पुस्तक प्रकाशना करता त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास श्री. सुधाकर मराठे यांनी आपल्या वडलांच्या स्मरणार्थ रु. १०००/- ची देणगी मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेस दिली.

श्री. गजाननराव मराठे यांचे मराठे प्रतिष्ठान - मुंबई द्वारा हार्दिक अभिनंदन आणि 'जीवेत् शरदः शतम्' या शुभेच्छा. ◆◆◆

*(पृष्ठ ८ वरून)*

## संभावित फसवणूक

लागतो. चार दिवस वाट बघू.' दरम्यान माझ्या ध्यानात आले की दोन फरशा सैल बसल्या आहेत. त्यांच्यावर पाय पडला की पच्कन् कडांमधून पाणी वर येते. मी त्या माणसाकडे गेलो. त्याने संध्याकाळी येऊन दुरुस्ती करण्याचे मान्य केले व त्याप्रमाणे तो हत्यारे घेऊन आलाहि. हलणाऱ्या फरशा बघितल्या आणी म्हणाला, 'सिमिट आहे ना उरलेलं? जरा द्या.' मग माझ्याच घरातील अलिमेनचे एक पातेले घेऊन त्यात सिमिट कालवले. हलणाऱ्या फरशा फोडून काढल्या. मग म्हणाला, 'तीन फरशा आहेत ना शिल्लक? आणा जरा त्या.'

त्या घेऊन त्याने लावल्या, भेगा नीट बुजवल्या, ओले फडके त्यांच्यावर टाकले आणि सकाळी दहा वाजेपर्यंत संडास न वापरायचे सांगून तो निघाला. मी म्हणालो, 'हे तुम्ही फुकट करून देणार होतात ना?'

'हो दिले की. मी कुठे पैसे मागितले?'

'पण फरशा माझ्या, सिमिट माझं. तेच तुम्ही वापरलंत मग त्याचे पैसे?'

'आता असे आहे, सुतार, गवंडी आणि दुसरा कोणी कारागीर असो. तो मटेरियलचे आणि मजूरीचे पैसे गिऱ्हाइकाकडूनच घेतो. फरशा, सिमीटाचे पैसे तुम्ही आधीच दिले होते. मी काम करायची मजूरी घेतली नाही. म्हणजे फ्री दुरुस्ती केली.'

'पण माझं पातेलं सिमिट चिकटून खराब झालं त्याचं काय?'

पण हे शब्द ऐकायला तो तिथे नव्हताच!

**लेखक - श्री. अ.द. मराठे,**
**१० शांतिनाथ अपार्टमेंट, १६८,**
**यशवंत नगर, तळेगांव दाभाडे. जि. पुणे-४१०५०७**

◆◆◆

# माझी माणसे - प्रतिक्रिया

आपण निवृत्त होण्याचे वेध लागले म्हणजे व्यक्ती अनेक गोष्टी ठरवतात. नोकरी आणि सांसारिक जबाबदाऱ्या पार पाडतांना ज्या गोष्टी करता आल्या नाहीत त्या आता निवृत्तीनंतर करायच्या असे म्हणून भली मोठी यादी करतात. पहिले काही दिवस उत्साहाने करतातही परंतु नंतर आरामात दिवस काढतात व संकल्प हळूहळू विरू लागतात. असे सर्वसामान्य दृष्य आपल्याला नेहमी पहायला मिळते.

परंतु आपले कुलबांधव श्री. गजानन चिंतामण मराठे हे ३१ ऑगस्ट २००९ रोजी आयकर कार्यालयातून अधिकारी म्हणून निवृत्त झालो. ३० ऑगस्टला त्यांनी सर्व नातेवाईकांच्या सहवासात एक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमातील वैशिष्ठ्यपूर्ण भाग म्हणजे त्यांनी लिहीलेल्या 'माझी माणसे' या पुस्तिकेचा प्रकाशन समारंभ एक वर्षापूर्वी त्यांनी संकल्प केला होता की माझ्या सहवासात ज्या व्यक्ती आतापर्यंत आल्या आहेत त्यातील ६० व्यक्तिंचे व्यक्तिचित्रण रेखाटण्याचा मी प्रयत्न करीन. त्यानुसार त्यांनी कृती केलीही. माझी माणसे ही त्यांची पुस्तिका मी संपूर्ण वाचली.

निवृत्त होण्याच्या दिवशी ६० व्यक्तिंचे व्यक्तिचित्रण करून पुस्तिका काढायची हा श्री. गजानन मराठे यांचा संकल्प खूपच कौतुकास्पद आहे. कारण बरेच जण आत्मचरित्र लिहीतात. पण गजानन मराठ्यांनी इतरांबद्दल त्यांना वाटणाऱ्या भावना या पुस्तिकेत व्यक्त केल्या आहेत. इतरांनी अनुकरण करावे अशी ही असामान्य कल्पना आहे असे मला पुस्तिका वाचतांना जाणवले. त्यांनी सर्व व्यक्तिंचे सखोल निरीक्षण करून त्यांच्यातल्या चांगल्या गुणांचा आवर्जून उल्लेख केला आहे. शिवाय कोणत्या व्यक्तिकडून त्यांच्यातला कोणता चांगला गुण घेऊन आचरणात आणण्याचा प्रयत्न केला आहे. याचाही उल्लेख त्यांनी आवर्जून केला आहे. उदाहरणादाखल त्यांनी त्यांच्या वडीलांबद्दल केलेले व्यक्तिचित्रण सोबत देत आहे.

श्री. गजानन मराठे यांचे इतरही अनेक काही संकल्प असतील तर ते निश्चितपणे पूर्णत्वाला नेतील. याची मला खात्री आहे. त्यांचा निवृत्तीचा काळ आनंदमय, आरोग्यसंपन्न व सुखसमृद्ध जावो एवढीच सदिच्छा!

**- सौ. निलांबरी मराठे**
**(पृ.२८०)**

## कै. चिंतामण बळवंत मराठे

माझे वडील, माझ्या वडीलांचा जन्म महाबळेश्वरच्या राजवाड्यात झाला. म्हणून त्यांचे टोपण नाव आजीने राजा असे ठेवले. आम्ही त्यांना अण्णा म्हणत असू. त्यांना एकूण दोन मुले. अण्णांनी इन्कमटॅक्स कार्यालयात ३६ वर्षे सेवा केली. व १९८० साली ते सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सहकार्यामुळेच मला १४.१.१९७० साली आयकर कार्यालयात नोकरी मिळाली. त्यांनी व मी १९७० ते १९८० आयकर कार्यालयात एकत्र काम केले. अण्णांचे हस्ताक्षर उत्कृष्ट होते. तसेच त्यांना संगीताची फारच आवड होती. आपल्या मुलाने संगीतकार व्हावे या इच्छेने त्यांनी माझे टोपण नाव सुधीर असे ठेवले. आपल्या धाकट्या भावास (चंद्रकांत) त्यांनी पोस्टात नोकरीला लावले. अण्णांचे संपूर्ण जीवन कष्टमय गेले. पण त्यांनी त्याचा बाऊ केला नाही. त्यांचे व्यक्तिमत्व हसतमुख होते. १९६१ साली पुण्यात पानशेतचा पूर आला व आमचे कसब्यातील घर वाहून गेले व आम्ही काही काळ बेघर झालो. १९६२ ते १९७२ या काळात आम्ही निसेन हटस्मध्ये रहात होतो. अण्णांनी स्वत:चे घर १९७३ साली बांधले व त्यास **सार्थक** हे अनुरुप नाव दिले. त्यांनी माझे लग्न १९७९ साली आसावरीशी लावून दिले. त्यांना लॉटरीची तिकीटे खरेदी करण्याचा छंद होता. एकेवर्षी त्यांना लॉटरीचे बक्षीस लागले, व लागलेले बक्षीसातून त्यांनी सर्व देणी आपल्या हयातीत चुकती केली. १९८० साली सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी काही काळ आयकर कार्यालयातील सोसायटीचे तसेच सारसबाग मंदिरात काही काळ काम केले. त्यानंतर त्यांनी मराठे प्रतिष्ठानच्या सभासदांच्या नावनोंदणीचे काम केले. त्यांचा स्वभाव शांत व सोशिक होता. त्यांनी आपल्या उत्कृष्ट हस्ताक्षरात गुरुचरित्राची पोथी लिहून काढली. ते कायम इतरांचे कौतुक करत. मी त्यांचा आवडता मुलगा होतो. त्यांना वाचकांच्या पत्रव्यवहारात लेखन करण्याची आवड होती. त्यांची असंख्य पत्रे सकाळ पेपरमध्ये आलेली आहेत. १९९४ साली वृद्धापकाळामुळे त्यांचे दु:खद निधन झाले.

**- श्री. गजानन चिंतामण मराठे**

◆◆◆

# मराठे प्रतिष्ठान, सांगली

## हितगुज सभासदांची दुसरी बैठक दि. ११.१०.२००९

## श्री. अशोकराव मराठे यांच्या 'गंगानारायण' या निवासस्थानी

..हितगुजच्या सांगली मिरज येथील सभासदांच्या दि. ५ जुलै २००९ रोजीच्या पहिल्या बैठकीत ठरल्या प्रमाणे हितगुजचा सप्टेंबर २००९ चा अंक आल्यानंतरच्या महिन्यात म्हणजे दि. ११.१०.२००९ रोजी हितगुजच्या सभासदांची दुसरी बैठक श्री. अशोकराव मराठे यांच्या गंगानारायण निवासस्थानी दुपारी ४ वाजता भरली होती. त्यासाठी त्यांचे चिरंजीव श्री. आनंदराव यांनी सर्वांना पत्रे लिहून सपत्नीक आमंत्रीत केले होते. श्री. अशोकराव व त्यांचे बंधू श्री. अरविंदराव या दोघांनी सर्वांचे स्वागत केले.

बैठकीची सुरवात श्री. अशोकराव यांनी श्रीदत्तगुरुंच्यावर रचिलेल्या दोन भक्ती गीतांच्या गायनाने झाली. त्यामुळे बैठकीस एक प्रसन्न वातावरण प्राप्त झाले. सदर गीते फारच सुंदर आहेत. ती हितगुजसाठी पाठविण्याबाबत त्यांना केलेली विनंती त्यांनी मान्य केली.

बैठकीस आठ सभासद हजर होते पैकी सहाजण सपत्नीक आले होते. बैठकीत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

१) मागील सभेत ठरल्याप्रमाणे नऊ हितगुज सभासदांनी प्रत्येकी अेक हजार रुपये दिले ते प्रतिष्ठानकडे पाठविण्यात आले. त्या सभासदांची नांवे हितगुज सप्टेंबर अंकात प्रसिद्ध झाली आहेत.

२) नवीन पिढीतील व्यक्तींना सभासद करून घेण्याच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून पाच नवीन सभासद झाले आहेत. त्यांची प्रवेश वर्गणी व नावे वरील प्रमाणे हितगुजसाठी हजार रुपये पाठविताना पाठविली होती. परंतू त्यांची नावे हितगुज मधे आली नाहीत. त्याबद्दल प्रतिष्ठानला कळविण्याचे ठरले.

३) हितगुजसाठी ज्यांनी अजून हजार रुपये पाठविले नाहीत त्यांनी ते पाठवावेत अशी विनंती करण्यात आली. तसेच नवीन सभासद करून घेण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरले.

४) मराठे कुलवृत्तांतासाठी माहिती पाठविण्याचे फॉर्म श्री.वि.म. मराठे यांनी इंटरनेट वरून घेतले होते त्याचा नमुना प्रत्येकाला दिला व त्याप्रमाणे माहिती लवकरात लवकर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले.

५) मराठे प्रतिष्ठानच्या डायरीसाठी सौ. निलांबरी मराठे यांनी पत्राद्वारे केलेले आवाहन श्री. वि.म. मराठे यांनी वाचून दाखविले. त्याप्रमाणे उपस्थित ७ जणानी प्रत्येकी रु. शंभर पृष्ठदानासाठी लगेचच दिले. तसेच श्री. भास्कर दत्तात्रय यांनीही नंतर त्यासाठी रु.शंभर दिले. असे एकूण आठ जणांनी डायरीसाठी वर्गणी दिली. सदर रक्कम प्रतिष्ठानकडे पाठविली जाईल.

६) आपले कुलाचार, घराणे इ. साठी कुलवृत्तांताचा चांगला उपयोग होतो असे श्री. अशोकराव यांनी सांगितले.

७) पुढील मिटींग डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात अगर जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात श्री. भास्करराव यांच्याघरी होईल असे ठरले.

नंतर चहापान होऊन व सर्वांना दिवाळीच्याशुभेच्छा देऊन मिटींग संपन्न झाली.

**वि.म. मराठे, सांगली**

◆◆◆

### आवाहन

कै. चिंतामण बळवंत मराठे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ **आयत्या वेळची सामान्यज्ञान स्पर्धा**

शुक्रवार दिनांक २५ डिसेंबर २००९ रोजी मराठे प्रतिष्ठानच्या २०१०च्या डायरीचा प्रकाशन समारंभ आहे. हे आपणास माहित आहेच. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ४.३० ते ५ या वेळात आयत्या वेळची सामान्य ज्ञान स्पर्धा घेतली जाणार आहे. त्यासाठी वयाची अट नाही. कोणत्याही वयाची व्यक्ती या स्पर्धेत भाग घेऊ शकेल. ही स्पर्धा अर्ध्या तासाची असून त्यात वस्तुनिष्ठ स्वरुपाचे १०० प्रश्न असतील. उत्तरांचे तीन पर्याय दिले जातील. त्यातून एका उत्तराची निवड करायची आहे. स्पर्धेचा निकाल हितगुज मार्चच्या अंकात जाहिर केला जाईल. स्पर्धकांमधून गुणानुक्रमे पहिले तीन क्रमांक काढले जातील व त्यांना चेकद्वारे बक्षिस घरपोच पाठवले जाईल. पहिले बक्षिस ५०० रु. दुसरे बक्षिस ३०० रु. व तिसरे बक्षिस २०० रु. देण्यात येईल. तरी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेसाठी उपस्थित रहावे अशी विनंती आहे. आपण या स्पर्धेत भाग घेणार असल्यास शक्यतो आधी फोनवर कळवावे.

**संपर्क -**

श्री गजानन चिंतामण मराठे - २४५३१६५१

सौ. नीलांबरी रमेश मराठे - २४४५६२७०

माहेरच्या अंगणात हा सौ. निलांबरी मराठेंचा लेख आधी आलेला असूनही जागे अभावी सप्टेंबरच्या अंकात छापू शकलो नाही. क्षमस्व! त्यांनी त्यांचा मोठा भाऊ श्री. विद्याधर व्यंकटेश पुणतांबेकर यांच्यावर आधारीत जे प्रत्यक्ष अनुभव लिहीले आहेत. ते दुर्दैवाने आज हयात नाहीत. १७ ऑक्टोबर २००९ रोजी सकाळी १०.३० वा. त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो ही मराठे प्रतिष्ठान तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

**- संपादिका**

# माहेरच्या अंगणात

**लेखिका - सौ. नीलांबरी रमेश मराठे (पृ.२८०), पुणे**

माझी आई व माझा दादा माझे माहेर पुण्याच्या मध्यवस्तीत शनिवार पेठेतलाच. अजूनही आमचा स्वत:चा तीन मजली पुणतांबेकर वाडा आहे. माझ्या वडीलांचे जवळजवळ १९४० पासून अप्पा बळवंत चौकात 'व्यंकटेश बुक डेपो' हे जुन्या पुस्तकाचे दुकान होते. माझ्या जन्मानंतरची १० वर्ष अतिशय आनंदात आणि सुखात गेली. परंतु १९६५ साली माझे वडील दम्याच्या आजाराने आम्हाला सोडून गेले. तेव्हा आमच्या कुटुंबावर एकदम आभाळच कोसळले. कारण त्यावेळी माझी आई जेमतेम ३५ वर्षाची, मोठा भाई म्हणजे माझा दादा (विद्याधर उर्फ नंदू) १६ वर्षाचा, ताई (नंदिनी) १४ वर्षाची, अण्णा (दिलीप) १२ वर्षाचा, मी १० वर्षाची व माझा धाकटा भाऊ मोहन ७ वर्षाचा होता. आई फारशी शिकलेली नव्हती. त्याकाळी बायका कधीच दुकानात बसत नसत. त्यामुळे तिला दुकानच्या व्यवहाराचीही काही माहिती नव्हती. बाहेरची सर्व कामे आतापर्यंत वडीलच बघायचे. त्यामुळे आई फक्त चूल आणि मूल एवढेच सांभाळायची. वडील ८ मार्चला गेले तेंव्हा १५ मार्चला दादाची बोर्डाची (जुन्या ११वीची) परिक्षा होती. दादा वडीलांच्या दु:खामुळे परिक्षेला बसायला तयार नव्हता. परंतु वडीलांच्या चांगल्या मित्रांनी व काही नातेवाईकांनी सांगितले की नंदू मुळातच हुशार आहे. त्याला परिक्षेला बसू दे. त्याचे वर्ष वाया घालवू नका. शेवटी दादाने मॅट्रीकची परिक्षा द्यायची हा निर्णय जड अंत:करणाने घेतला. तेव्हा वडिलांचे सर्व विधी ओंकारेश्वरावर करून तो ११ वाजता बोर्डाच्या परिक्षेला जात असे. गणिताच्या पेपर तर तो अर्ध्या तासात देऊन आला. अशा परिस्थितीतही त्याला गणितात ९९ टक्के व एकूण ६९ टक्के मार्क मिळाले. परिक्षा संपली. वडलांचे १४ दिवस झाल्यावर हळूहळू सर्व नातेवाईकही आपापल्या घरी गेले. आता प्रश्न निर्माण झाला पोरांचा! खायचे काय? कारण या क्षणाला घरात कमावणारं कोणीच नाही.

सर्व आकाशच फाटले आहे. साऱ्या आभाळाला ठिगळे लावणे अशक्य आहे. प्रत्येक व्यक्तिला जीवनात सुखदु:खाचे अनुभव येत असतात. परंतु दु:खामुळे अवसान गाळून बसणारी व्यक्ती आयुष्यात पराभूत होत असते. आपल्या पदरी ५ मुले आहेत. आपण पराभूत झालो तर आपल्या मुलांचे काय होईल? शेवटी मुलांना मोठे करायचे या ध्येयाने प्रेरीत होऊन आईने भरपूर कष्ट करायचे ठरवले. सर्वांगीण विचार करून आई व माझ्या दादाने निर्णय घेतला की आपले चांगले पुस्तकाचे दुकान आहे. तेच चालवायचे. त्यामुळे भावाने ११२वी नंतर बी.एम.सी.सी. कॉलेजमध्ये वाणिज्य शाखेला प्रवेश घेतला. सकाळी आई घरातले सर्व आवरून ८.३० वा. दुकान उघडायची. दादा कॉलेज संपल्यावर लगेचच दुकानात यायचा. आई व दादाने दुकानची सर्व माहिती करून घेतली. त्याकाळी जुनी पुस्तके विकत घेऊन, बाईंडींग करून ती विकायची यासाठी आमचे दुकान प्रसिद्ध होते. गिऱ्हाईके जोडलेली होती. त्यामुळे आई व दादा दुकानात दिवसभर जुनी पुस्तके घ्यायचे, रात्री त्याला बाईंडींग करायचे व नंतर ती चांगली करून विकायची. असा दिनक्रम सुरू झाला. त्यांना माझी ताई व अण्णा मदत करायचे. मी व माझा धाकटा भाऊ लहान असल्यामुळे आमच्या जोगती कामे आम्ही करत असू.

दिवसभर कष्ट करूनही आई आणि दादाला वाटायचे की आपल्या आयुष्यात आता चिंता, काळजी हे अविभाज्य असे घटक होऊन बसले आहेत. आपल्या आयुष्यातील चिंतेला जेवणातील मीठाचे स्थान आहे. त्यामुळे हतबल न होता प्रतिकूल परिस्थितीशी सामना द्यायलाच पाहिजे. हे जाणून प्रयत्नांती परमेश्वर या उक्तीनुसार प्रयत्न करत रहायचे. वडलांच्या पुण्याईने प्रयत्नांना यश आले.

हळूहळू दुकानावर आमचा प्रपंच सुरु झाला. घरातल्या वातावरणामुळे एक गोष्ट आम्ही सर्वजण नकळत शिकलो की कोणत्याही गोष्टीसाठी हट्ट करायचा नाही. आईला दुखवायचे नाही, प्रत्येक गोष्टीत सतत समायोजन करायचे. त्यामुळे तेंव्हापासून आपोआपच स्वभावात समजूतदारपणा आला.

दादा बी.कॉम. झाल्यावर त्याला लगेचच स्टेट बँक ऑफ इंडियात नोकरी मिळाली. आमच्या वडलांना शिक्षणाची खूप हौस होती. आपल्या मुलांनी खूप शिकावे असे त्यांना वाटत असे. त्यामुळे भाऊ दुकान सांभाळून, नोकरी करून एकीकडे शिकत होता. त्याने बँकेच्या सर्व परिक्षा दिल्या. I.C.W.A. आणि M.P.M. पूर्ण केले. ताईने S.S.C. नंतर G.C.D. केले. तिला स्वत:हून लगेचच मागणी आल्यामुळे तिचे लग्न झाले. आता अण्णा मोठा झाल्यामुळे दुकान सांभाळू लागला. दादाला प्रमोशन मिळत गेले आणि त्याच्या बदल्या होत गेल्या. दादाचेही लग्न झाले. आम्ही सर्व भावंडे हळूहळू मोठे झालो. दादाने मला M.A.M.Ed पर्यंत शिकवले. माझे लग्नाचे वय झाले तेंव्हा दादा भोरच्या बँकेत होता. त्यावेळी वहिनी व दादाची मुलेही भोरलाच होती. पण दर शनिवारी बँक संपल्यावर दादा भोरहून माझ्यासाठी स्थळे पहायला पुण्यात यायचा. आणि सोमवारी सकाळी पुन्हा भोरला जायचा. असा क्रम बरेच दिवस चालू होता. दर रविवारी सुट्टीचा दिवस असूनही तो माझ्यासाठी पुण्यात यायचा. या गोष्टीला वहिनींनी कधिही विरोध केला नाही. याबद्दल त्यांचेही कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. आम्हा सर्व भावंडांची लग्ने दादावहिनींनीच लावली आहेत.

माझे सर्व भाऊ, भावजया, भाचे आणि भाचेसुना, भाचे जावई अतिशय चांगले आहेत. माझ्या बहिण भावंडांच्या घरी सर्व सुख दु:खाच्या प्रसंगी मी हजर असते. माझ्या तिन्ही भावजया तर नेहमी म्हणतात की कोणत्याही प्रसंगी सुरेखा वन्स हजर असल्या म्हणजे आम्हाला मानसिक आधार वाटतो. (मला माहेरी सुरेखा म्हणतात.)

*(पृष्ठ १३ वर)*

## जाहीर निमंत्रण

मराठे प्रतिष्ठानचा ३०वा वर्धापन दिन व पुणे शाखेतर्फे काढण्यात येणाऱ्या २०१० सालच्या डायरीचा प्रकाशन समारंभ असा एकत्रित कार्यक्रम शुक्रवार दिनांक २५ डिसेंबर २००९ रोजी आयेजित केला आहे.

या निमित्त पुढील कार्यक्रमांची आखणी केली आहे.

१. आयत्या वेळची सामान्यज्ञान स्पर्धा. (ऐच्छिक आहे)
२. 'ऋणानुबंधन जवानांचे' या कार्यक्रमात लडाख आणि कारगील बद्दल सौ. अनुराधार्ता प्रभुदेसाई स्लाईडस्च्या आधारे माहिती देणार आहेत.
३. श्री गजानन चक्रदेव यांच्यातर्फे ति. प.पू. लिलाताई चक्रदेव यांच्या नवरात्र अष्टमी उत्सवावर आधारीत फिल्म दाखवण्यात येणार आहे.

तरी आपण या विविधांगी आकर्षक कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती. तरुणांनीही या कार्यक्रमात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे. अशी प्रामाणिक इच्छा आहे.

कार्यक्रम विनामूल्य आहे.

स्थळ - गांधर्व महाविद्यालय सभागृह, ४१५ शनिवार पेठ, मेहुणपुरा, जोशी बंधू मंगल कार्यालयाजवळ, वर्तक आश्रमाशेजारी, पुणे- ४११०३०.

वेळ - सायंकाळी ४ ते ८

**सौ. निलांबरी मराठे (पृ.२८०)**

---

*(पृष्ठ १ वरून)*

## माहेरच्या अंगणात

आता आम्हा पाचही बहिण भावंडांच्या घरी सुखी आणि आनंदी वातावरण आहे. पुढच्या पिढीतील सर्व भाचरेही उच्चशिक्षित आहेत. सर्वांची आर्थिक स्थितीही चांगली आहे. सर्वजण खाऊन पिऊन सुखी आहेत. दादाच्या घरात तर शैक्षणिक, आर्थिक, कौटुंबिक अशा सर्व बाबतीतली सुखे हात जोडून उभी आहेत. परंतु या सुखांचा उपभोग घ्यायला दादाची शारीरिक ताकद कमी पडते आहे. कारण माझ्या दादाला लहान वयात अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागल्या. त्यामुळे त्याला अकाली प्रौढत्व प्राप्त झाले. तो शारीरिक दृष्ट्या नेहमी अशक्त राहिला. आता तो ६० वर्षांचा आहे. पण त्याला श्वसनाचा त्रास सुरु झाल्यामुळे त्याने बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. त्याच्या तब्बेतीत सुधारणा होण्याच्या दृष्टिने सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार चालू आहेत.

माझ्या आईचेही सर्व आयुष्य अतिशय कष्टात गेले. आई आता ८१ वर्षाची आहे. म्हणून नुकताच आम्ही पाचही बहिण भावंडांनी मिळून आईचा सहद्रदर्शनाचा कार्यक्रम केला. तेंव्हा पुस्तके आणि साखरेची तुला केली होती. तेंव्हा आईच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहून आम्ही सर्वजण अतिशय खूष झालो.

आमचे पुस्तकाचे दुकान आज अण्णा स्वतंत्रपणे सांभाळत आहे. सध्या जुनी पुस्तके घेणारे गिऱ्हाईक नाही. त्यामुळे परिस्थितीनुसार दुकानात बदल करून आता शैक्षणिक साहित्य विक्रीचे प्रमाण जास्त आहे.

अशा प्रकारे माझी आई आणि माझा दादा यांनी आयुष्यभर कष्ट आणि त्याग करून आम्हा सर्व भावंडांना लहानाचे मोठे केले. चांगले संस्कार दिले. त्या दोघांनी खूप सोसले. त्यामुळे माझी आई आणि आम्हाला पित्यासमान असलेला दादा या दोघांचे छत्र कायम मिळू दे. दोघांच्याही तब्बेती चांगल्या राहून त्यांना उदंड आयुष्य मिळू दे. एवढीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

**- सौ. नीलांबरी मराठे**
१५२, शनिवार पेठ,
पुणे - ४११०३०.
फोन-घर-६५२००६९८
ऑफीस-२४४५६२७०

◆◆◆

---

(सौ. उर्मिला व श्रीनिवास मराठे पुणे यांची नात) सौ. अनुपमा अजय जोशीराव यांची कन्या चि. अवनी जोशीराव (पृ. ३८९) जन्म दि. २७.९.२००३

### पाऊस

रिमझीम रिमझीम पाऊस आला,
कडकड कडकड वाजायला लागल,
रस्ता सगळा बुडायला लागला
झाडे सगळी हलायला लागली
दि. २३ मे २००७ वेळ - दु. ४ वा.
वय - ३ वर्ष ८ महिने

### (मशरुम, मशरुम)
### Mushroom, Mushroom

Mushroom, Mushroom,
you didn't know, the rain
comes just two minutes,
And sky will change in black
colour

◉◉◉

### Rain - (पाऊस)

Rain Rain give me water,
Water, Water give me water,
I drink so much water in the
summer holiday.

◉◉◉

### Pencil, Pencil
### (पेन्सिल,पेन्सिल)

Pencil, Pencil write much
Sharpener, sharpener pencil do
Sharp,
and we have to do very much
homework.

Poet - Avani Joshirao
Date - 12.8.09
Time-10.30 p.m.
Age-5 years and 11 months

**चि. अवनी अजय जोशीराव**
बी-१/४०१ कुबेर गार्डन,
एकलव्य कॉलेजसमोर,
कोथरुड, पुणे ३८.
फोन– २–२५२८५१४०

# चित्रकूटच्या पर्वतराजीतून
## (प्रवासवर्णन)

'काशिसी जावे नित्य वदावे' असे म्हणत म्हणत अनेक वर्षे गेली पण काशियात्रा काही घडली नाही. अखेरीस फेब्रुवारी २००९ च्या शेवटच्या आठवड्यात हा योग जुळून आला आणि आम्ही ३ जोडप्यांनी यात्रेचा दौरा निश्चित केला. त्याचवेळी कोणीतरी सुचविले की ह्या यात्रेला जोडूनच चित्रकूट का पाहून येत नाही? जो चित्रकूट पर्वत राम-लक्ष्मण सीता ह्यांनी वनवासाच्या काळात आपल्या पदस्पर्शाने पावन केला होता तो स्वत: जाऊन बघण्याची ईच्छा होतीच. शिवाय माननीय श्री नानाजी देशमुखांसारख्या समाजसंताने ग्रामोद्धाराचे कार्य सुरू केले ते ह्या चित्रकूट भागातच. तेही बघायचे होते म्हणून त्या दौऱ्यात 'चित्रकूट' चा पण समावेश केला. आणि मुंबई, अलाहाबाद, प्रयाग, चित्रकूट अयोध्या वाराणसी गया मुंबई असा दौरा आखला.

प्रथमत: अलाहाबादला जाऊन अलाहाबाद प्रयाग पाहून त्रिवेणी संगमात स्नान करून चित्रकूटला प्रयाण केले. अलाहाबादहून सकाळी ७ वाजता चित्रकूटला जाण्यासाठी गाडीने निघालो. फेब्रुवारी महिना असल्याने हवेत गारवा होता व फारच प्रसन्न वातावरण होते. अलाहाबादहून चित्रकूटचा रस्ता, सरळ सपाट निर्जन असा असून रस्त्याच्या दोहोबाजूस लांबच लांब पसरलेली गव्हाची शेते असून त्यामध्येच पिवळ्या फुलांनी डवरलेली मोहरीची रोपे डुलत होती. जणूकाही लांबवर पसरलेला हिरव्या पिवळ्या रंगांनी विणलेला गालिचाच दिसत होता. त्या देखाव्याची छबी घेण्याचा आणि नातीसाठी चारदोन फुले व गव्हाच्या ओंब्या घेण्याचा मोह न आवरता येणारा होता. जाताना मध्येच जंगलभागही लागतो. मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश ह्यांची सीमा रेषेवर व चित्रकूट पायथ्याशी असलेल्या आदिवासी बहुलवस्तीस चित्रकूट गांव असे म्हटले जाते. ते आहे बांदा व सतना जिल्ह्यात.

चित्रकूट पर्वतास पौराणिक महत्त्व आहे. रामसीतेने आपल्या वनवासाच्या काळातील अनेक वर्षे ह्या पर्वतावर काढली. नलराजाने ह्या पर्वतावर तप करून आपले गेलेले राज्य परत मिळविले होते. महाभारतकाळी धर्मराजाने पण येथे तप केले होते. रामायण कर्त्या वाल्मिकी ऋषीने म्हटले आहे की माणूस ह्या चित्रकूट पर्वताची जितकी शिखरे




**सौ. उर्मिला श्रीनिवास मराठे**
(पृ.३८९)


पाहिल तितकी त्याला 'कल्याण मंगले' प्राप्त होतील. रामायणकाळी ह्या प्रदेशाचा विस्तार १० कोस होता असे म्हणतात.

चित्रकूट ह्या पर्वतावर रामाने ११ १/२ वर्षे वास्तव्य केले, होते. असे आम्हाला मार्गदर्शकाने सांगितले. ह्या चित्रकूट पर्वतावर बघण्यासारखी अनेक स्थळे आहेत. प्रसिद्ध राम भरत भेट झाली ते स्थळ. ऋषी अत्रि आणि सती अनसूया ह्यांचा आश्रम, स्फटीक शीला गुप्तगोदावरी, कामदगिरी, हनुमानधारा इ. अनेक स्थळे प्रेक्षणीय आहेत.

अनसूया आश्रम रामघाटापासून अत्यंत जंगलमय भागातून जाणाऱ्या १८ कि.मी. अंतरावर मंदाकिनी नदीजवळ हा आश्रम आहे. प्राचीन विवरणानुसार येथूनच दंडकवन, दंडकारण्य सुरु होते. व रावणाच्या राज्याच्या सीमाप्रारंभ पण येथूनच होतो. ह्याच आश्रमात आपापल्या पत्नींच्या आग्रहावरून ब्रह्मा, विष्णु, महेश सती अनसूयेची सत्त्वपरीक्षा घेण्यासाठी आले आणि येथे श्री दत्त जन्म झाला. ज्या ठिकाणी अत्रिऋषींचा वास होता तेथे आता मोठे मंदिर बांधले असून सत्वपरिक्षेचे प्रसंग मूर्तींच्या स्वरुपांत दाखविले आहेत. सती अनसूयेने सीतेला दागिने दिले ते दृष्य स्वरुपात येथे दाखविले आहे. त्या मंदाकिनी नदीच्या काठी असलेला हा आश्रम पाहतांना ज्याने गीतरामायण ऐकले आहे वाचले आहे त्याला 'या इथे लक्ष्मणा बांधकुटी या मंदाकिनीच्या तटी निकटी' ह्या गीताचे स्मरण झाल्याशिवया रहात नाही. कारण राम आणि गदिनांचे गीतरामायण प्रत्येक मराठी माणसाच्या मनात भरून राहिलेले आहे. येथे मंदाकिनी नदीचे दर्शन घेतलेव सौख्यासाठी नदीत दिवे सोडले. संध्याकाळी हरिद्वारला जशी गंगेची आरती करतात तशीच येथे मंदाकिनीची करतात.

राम आणि सीता ज्या स्फटीकशिळेवर बसून गुजगोष्टी करीत तो पाहिला. भरतभेट ज्यास्थळी झाली ते पाहिले.

चित्रकूट मध्ये मला सर्वात भावलेले ठिकाणी म्हणजे 'गुप्त गोदावरी' दक्षिणेतून ऋषीमुनींसमवेत गुप्तपणे गोदावरीनदी रामदर्शनासाठी चित्रकूटपर्वतावर आली. ज्या ठिकाणी तिला रामदर्शन झाले तेथे प्रवाह सुरु झाला. तो तसाच थोडा पुढे जाऊन गुप्त झाला. व थेट नाशिकला प्रगटला. ते ठिकाण म्हणजे गुप्त गोदावरी. ह्या ठिकाणी २ गुंफा निर्माण झाल्या आहेत. ह्या गुंफा म्हणजे निसर्गाचा एक चमत्कारच आहे. जणूकाही एकावर एक शिला रचून कोरीव काम केलेल्या गुहाच वाटतात. देवळासारखे त्याचे रकुप मनाला खूपच भावते. आत शंकराचे देऊळ आहे. गुहेत आत पाणी वाहत असते. खोली किती आहे ते माहित नसते. त्यामुळे आत प्रवेश करण्यास भिती वाटत होती. पण मनाचा हिय्या करून आत प्रवेश केला. प्रवाहांतून चालताना गुडघ्यापर्यंत पाणी लागल्यावर क्षणभर भिती वाटली. चालताना आपण कुठे चाललो आहोत ते प्रथम कळतच नाही. पण पुढे जाताजाता आपण परत पहिल्या ठिकाणी येऊन पोहचतो. पाण्यातून जाताना अंधार खूप वळणे आणि अरुंद वाटा आहेत. परंतु कोठेही घसरावयास होत नाही. पाणी गुडघ्यापर्यंतच होते. कोठेही कमी किंवा जास्ती नाही आणि वळणावळणातून वाट काढीत आपण परत पहिल्या ठिकाणी बरोबर येऊन पोहचतो. हे त्याचे वैशिष्ट्य. हे सर्व पाहिल्यावर निसर्गाचे अनेखे रुप पाहून मन भांबावते. गुहेत प्रगट होऊन प्रवाहणारी गोदावरी वाहत खाली येते आणि कुंडात उडी घेते आणि तेथून ती गुप्त होऊन कोठे जाते ते कळत नाही.

हनुमानधारा हाही इथला एक निसर्गाचा चमत्कारच. येथे डोंगरावर एक गढी आहे. हनुमान जेव्हा लंकादहन करून रामाकडे परत आला त्यावेळी त्याने रामाची आराधना केली. तेव्हा रामाने त्याला ह्या गढीत वास्तव्य करण्यास सांगितले. त्यावेळी हनुमानाच्या डाव्या बाहुवर व समोर संतत पाण्याची धार पडु लागली. त्याच्या शीतलतेमुळे हनुमानाचा दाह कमी झाला. म्हणून त्या धारेस हनुमानधारा असे म्हणतात. तेथे पोहोचण्यास ५००-५५० पायऱ्या चढून जावे लागते.

चित्रकूट प्रवासात एक अवश्य करण्याची गोष्ट म्हणजे 'कामदगिरी परिक्रमा' ही एक सुखद आणि आनंद देणारी परिक्रमा आहे. कामदगिरी हा एक डोंगर आहे. येथे फार पूर्वीपासून कामनादेवीची प्रतिष्ठापना झालेली आहे. श्रीरामाने वनवास काळात ह्या देवीची मन:पूर्वक पूजा व आराधना केली होती आणि देवीने, प्रसन्न होऊन श्रीरामाची कामना पूर्ण केली. म्हणून जो कोणी ह्या डोंगराला प्रदक्षिणा घालेल त्याचे मनोरथ पूर्ण होईल असे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या प्रदक्षिणेला 'कामदगिरी परिक्रमा' असे म्हणतात. ती एकूण ६ कि.मी. असून ती पूर्णपणे अनवाणी पायांनी करावी लागते. अलिकडे उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश ह्या शासनांनी परिक्रमेचीवाट फरशीबंद केली आहे. त्यामुळे परिक्रमा करण्यास फार सायास पडत नाहीत. ह्या वाटेवरील मंदिराला चार दिशांना चार प्रवेश द्वारे असून त्यांना मुखारविंद म्हणतात. वाटेवर इतरही अनेक देवळे आहेत. पण वेळेअभावी आम्ही प्रत्येक देऊळ काही पाहिले नाही. फक्त दुर्गामातेचे दर्शन तेवढे घेतले. येथे रामसेवकांचा (वानरे) मुक्त संचार चालू असतो. एका वानराने आम्ही प्रसाद म्हणून घेतलेले रेवडीचे पाकीट हातातून हिसकावून घेतले. असो. प्रभोच्छा. ६ कि.मी. ची परिक्रमा कोठेही न थांबता करून सुद्धा आमच्यापैकी कोणालाच थकवा अजिबात वाटला नाही. किंबहुना सर्वचजण उत्साही होतो.

अशा ह्या पौराणिक महत्त्व असलेल्या चित्रकूट गावाचे आणखी एक महत्त्व म्हणजे आर.एस.एस. चे नानाजी देशमुख ह्यांनी ग्रामोद्धार कल्पना मांडली व चित्रकूट गावाची निवड करून स्वत: ती राबविली, बराच जंगलमय व अशिक्षित आदिवासी बहुलवस्ती असलेला हा गाव सुधारण्यासाठी लोकांना शिक्षित करण्यासाठी शाळा सुरु केल्या. लोकांचे आरोग्य सुधारावे म्हणून वैद्यकीय सोयी केल्या. दवाखाने, हॉस्पिटल सुरू केले. ग्रामस्थाच्या अडचणी राज्य व केन्द्र सरकारपर्यंत पोहचविल्या. त्यांचे हे कार्य अनेक अनुयायांमार्फत आजही चालू आहे.

रामदर्शन ही नानाजींची जनतेला दिलेली अपूर्व अशी देणगी आहे. रामाचे जीवनचरित्र चित्रांच्या आणि मूर्तीच्या शिल्पाच्या माध्यमातून त्यांनी या वास्तूत घडविले आहे. राम हा चरित्रनायकच असा आहे की त्यावरील काव्य काय लेखन काय किंवा त्याचे देऊळ काय राम-मर्यादा पुरुषोत्तम मनाला मोहवतोच. 'रामदर्शन' असेच सुंदर चित्ररुपाने आणि शिल्परुपाने आपल्यासमोर येते. मुंबई, पुणे वगैरेच्या कलाकारांनी येथे येऊन ही चित्रे आणि मूर्ती (शिल्पाकृती) बनविल्या आहेत. या प्रांगणात प्रवेश करताक्षणीच भव्य मारोतराय (हात जोडून उभे असलेले) आपल्या नेहमीच्या दास्यभक्तितून आपल्याला दर्शन देतात आणि मग आपण मोठ्या दालनांमध्ये कधी शिरतो आणि तेथून कधी बाहेर पडतो हे आपले आपल्यालाच उमगत नाही. इतकी ही चित्रे उत्कृष्ट रंगसंगतीने नटलेली आहेत ही विलोभनीय चित्रे शिल्पे रामाचे सर्व चरित्र आपल्यासमोर साक्षात उभे करतात. चित्रकूट प्रवासात 'रामदर्शन' या संग्रहालयाचा सर्वात मोठा वाटा आहे.

चित्रकूट मध्ये अवतीभवीत अशी बरीच ठिकाणे पाहून झाली अजून पुढचा बराच प्रवास करावयाचा होता. रामाच्या वनवासातील गावाकडून आम्ही मग रामाच्या प्रिय नगरीकडे अयोध्येकडे कूच केले.

**- सौ. उर्मिला श्रीनिवास मराठे**
(पृ.३८९)
दख्खन पाटबंधारे सोसायटी,
त्रिवेणी नं. १/६,
३६/९ एरंडवणे. पुणे-४११०३८.
फोन - ०२०-२५४६४७०६.

◆◆◆

## Microwaving Water!

A 26-year old man decided to have a cup of coffee. He took a cup of water and put it in the microwave to heat it up (something that he had done numerous times before). I am not sure how long he set the timer for, but he wanted to bring the water to a boil. When the timer shut the oven off, he removed the cup from the oven. As he looked into the cup, he noted that the water was not boiling, but suddenly the water in the cup 'blew up' into his face. The cup remained intact until he threw it out of his hand, but all the water had flown out into his face due to the build up of energy. His whole face is blistered and he has 1st and 2nd degree burns to his face which may leave scarring.

He also may have lost partial sight in his left eye. While at the hospital, the doctor who was attending to him stated that this is a fairly common occurrence and water (alone) should never be heated in a microwave oven. If water is heated in this manner, something should be placed in the cup to diffuse the energy such as a wooden stir stick, tea bag, etc.., (nothing metal).

**General Electric's Response:**

Thanks for contacting us, I will be happy to assist you. The e-mail that you received is correct. Microwaved water and other liquids do not always bubble when they reach the boiling point. They can actually get superheated and not bubble at all. The superheated liquid will bubble up out of the cup when it is moved or when something like a spoon or tea bag is put into it.

To prevent this from happening and causing injury, do not heat any liquid for more than two minutes per cup. After heating, let the cup stand in the microwave for thirty seconds! Before moving it or adding anything into it.

Here is what our local science teacher had to say on the matter: 'Thanks for the microwave warning I have seen this happen before.. It is caused by a phenomenon known as super heating. It can occur anytime water is heated and will particularly occur if the vessel that the water is heated in is new, or when heating a small amount of water (less than half a cup).

What happens is that the water heats faster than the vapour bubbles can form. If the cup is very new then it is unlikely to have small surface scratches inside it that provide a place for the bubbles to form. As the bubbles cannot form and release some of the heat has built up, the liquid does not boil, and the liquid continues to heat up well past its boiling point.

**प्रेषक - श्री.रमाकांत विद्वांस**
(पृ.६२३)

***गणपतीविसर्जनाचे वेळी, सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात मिरज येथे दंगल झाली. नंतर जवळजवळ आठ दिवस संचारबंदी होती. कवयित्रीच्या अस्वस्थ मनाने दंगलीचे वास्तव रुप आणि स्वतंत्र भारतात लोकशाहींचा झालेला पराभव याचे केलेले विदारक चित्रण पुढील कवितेत पाहायला मिळते.***

## विसर्जन स्वातंत्र्याचे

देखाव्याचे झाले निमित्त, समाजकंटकांचे खवळले पित्त
उन्मत्त पोलिसांनी त्यांना घातले पाठीशी
हिंदूस्थानात वनवासी, आम्ही मिरजवासी।।१।।
पोलिसांच्याच गाडीवर हिरवा झेंडा फडकला
देशद्रोही लोकांनी मूर्तीभंगही केला।
वणवा पेटला दंगलीचा
कृष्णप्रताप पहाता विझवणाऱ्या पोलिसांचा।
दोषी सोडून निरपराध्यांना पाडले त्याने फशी
हिंदूस्थानात वनवासी, आम्ही मिरजवासी।।२।।
चार दिवस धुमसत होते, सत्ताधारी मस्त होते
विरोधी नेतेही सारे दुरून गंमत बघत होते।
हळूहळू सगळीकडे लोण जसे पसरले
पोळी भाजण्या स्वत:ची सारे जण सरसावले।
मग फैरी झडल्या आरोपांच्या, कोण बरोबर कोण दोषी
हिंदूस्तानात वनवासी, आम्ही मिरजवासी।।३।।
व्होट बँक जपू का भावना ? प्रश्न मोठा पडला
निर्णायाची वाट बघत विघ्नहर्ता रखडला।
रक्षकच झाला भक्षक कोणी उरला नाही वाली
या स्वतंत्र भारतात माणुसकीच पोरकी झाली।
स्वार्थापुढे सामान्यांची किंमत कळणार तरी कशी ?
हिंदूस्तानात वनवासी, आम्ही मिरजवासी।।४।।
दहशतीचे वातावरण हाल झाले अनंत
गणपतीसह सर्वांचा पाहिला गेला अंत।
एकच ठराव झाला, नाही झुकवायची मान
दाखवून देऊ जगाला स्वधर्माचा अभिमान।
शिवाजीची शिकवण आम्ही विसरणार तरी कशी ?
हिंदूस्थानात वनवासी, आम्ही मिरजवासी।।५।।
खानवध, शिवपराक्रम इतिहासजमा झाला
वर्तमानात लोकशाहिचाच कोथळा बाहेर निघाला।
तोडगा निघेल, विसर्जन होइल
अंगावरील माराचे वणही कदाचित मिटतील।
पण हिंदुहृदयाला झालेली जखम भरून येइल कशी ?
हिंदूस्थानात वनवासी, आम्ही मिरजवासी।।६।।

**- सौ. विद्या वैशंपायन (पृ.२३५)**
भक्ती अपार्टमेंट, बिबवेवाडी, पुणे ४०००३७.
फोन-०२०-२४२१६३७२
(श्री. वि.म. मराठे, सांगली यांच्या कन्या)

### हितगुज राखीव फंड निधी

श्री. सुरेश मराठे (पृ.५०३) डोंबिवली, श्री. सदाशिव गोविंद, श्रीपाद यशवंत, विजय यशवंत, श्री.चिंतामण म. मराठे, लालबाग, श्री.प्रकाश खांबेटे, जळगाव, श्रीमती शालिनीताई मराठे, लॅमंगटन रोड, मुंबई, श्री.सखाराम नागेश मराठे, चुनाभट्टी, श्री.अनंत वामन मराठे, अंधेरी, कर्नल श्री.प्रमोदन मराठे, पुणे, श्री.शशिकांत बाळकृष्ण मराठे, ढवळी–गोवा, श्री. अरुण शिवराम मराठे, ढवळी-गोवा, श्री.कालिदास बाळकृष्ण मराठे, ढवळी-गोवा, श्री.नारायण जनार्दन जाईल, ठाणे, श्री.सुरेश वामन मराठे, ठाणे, श्री.रामकृष्ण गणेश मराठे, बोरीवली, श्री.राजा मराठे, मालाड, श्री.अरुण गणेश मराठे, मुंबई, श्रीमती साधना अनंत मराठे, नाशिक, श्री.सदानंद रामकृष्ण खांबेटे, ठाणे, सौ.सुहासिनी नारायण मराठे, कल्याण, एक हितचिंतक, बोरीवली.

### सांगली येथील पाच नविन सभासद

(१) श्री.अशोक नारायण मराठे, (२) श्री. प्रसाद विद्याधर मराठे, (३) श्री.विश्वेश विठ्ठल मराठे, (४) श्री. ओंकार चिंतामणी मराठे, (५) श्री.अमित अरविंद मराठे.

या देणगी दिलेल्या सर्व कुलबांधवांचे मराठे प्रतिष्ठान द्वारा आभार आणि धन्यवाद!

### विशेष सूचना

हितगुज राखीव फंड निधी - देणगी, शक्यतो चेक द्वारे 'मराठे प्रतिष्ठान' असे नाव लिहून संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावीत.

◆◆◆

### नांदा सौख्यभरे

चि. निरंजन प्रभाकर मराठे (पृ.१२०) (वडाळा) यांचा शुभविवाह सौ.कां. भक्ती नीळकंठ काळे (कळवा-ठाणे) हीज बरोबर शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २००९ला १२वाजून ३१ मिनिटांच्या शुभमुर्हुतावर, ब्राह्मण सेवा संघ, ठाणे येथे थाटामाटात संपन्न झाला. वधू-वरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी विख्यात निवेदक श्री.भाऊ मराठे, मराठे प्रतिष्ठानचे विश्वस्त, अध्यक्ष, अुपाध्यक्ष, कार्यकारिणीवरील सदस्य मोठ्या संख्येने अुपस्थित होते. तसेच योगतज्ज्ञ पद्मश्री श्री.सदाशिवराव निंबाळकर, सौ.शकुंतला निंबाळकर, हिंदुमहासभेचे भूतपूर्व अध्यक्ष श्री.विक्रमराव सावरकर, सौ.स्वामिनी सावरकर वधूवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते.

(चि. निरंजन हे डॉ. सौ. सुमेधा आणि श्री. प्रभाकर मराठे यांचे चिरंजीव आहेत.)

# माणसे

## लेखक - श्री. अ.द. मराठे

एकदा शाळेतल्या एका मुलाने त्याच्या आजोबांची चिठी मला आणून दिली. चिठीत विनंती केली होती की शंकराचार्यांच्या चर्पटपज्जरी स्तोत्रातील 'प्राप्ते संनिहिते मरणे न हि न हि रक्षति डू कृञ् करणे' याचा अर्थ कळवावा. मी त्यांना प्रत्युत्तरात कळविले की 'डू कृञ् करणे' हा चरण पाणिनीच्या धातुपाठातून घेतला आहे. यातील डू आणि ञ् या अक्षरांना अनुबंध म्हणतात. डू या अनुबंधामुळे धातूला त्रिम प्रत्यय लागतो आणि कृत्रिम असे विशेषण तयार होते. 'इन दि सेन्स ऑफ एक्झिक्यूशन' असा आहे. शंकराचार्यांना सूचित करायचे आहे की मरण जवळ आले असता देवाचे स्मरण करावे. त्या क्षणी व्याकरणाची घोकंपट्टी उपयोगी पडत नाही. परमेश्वराचे नांवच उपयोगाचे ठरते. मला वाटले होते आजोबा एवढ्या स्पष्टीकरणाने संतुष्ट होतील.

पण दुसऱ्या दिवशी ते स्वत:च आले. माझी चिठी माझ्या हातांत देत त्यांनी मला विचारले 'हा अर्थ तुम्हाला कुठे मिळाला' मी म्हणालो 'हा मला माझ्या वडिलांनी सांगितला. पाणिनीय धातुपाठाशी परिचित असलेल्या कोणालाहि तो सांगता येईल.' 'हा कुठल्या डिक्शनरीत दिला आहे?' आजोबांनी विचारले.

'असले अर्थ कोणत्याहि डिक्शनरीत नसतात. ते परंपरेने चालत येतात.' मी उत्तर दिले. 'तुमच्या ग्रंथालयांत डिक्शनरी मिळेल का बघायला?'

मी म्हणालो 'माझ्या ग दारावरूनी। राजाचा हत्ती गेला।' यातील दारावरूनच अर्थ दाराजवळून होतो. तो आपल्याला सहज कळतो. या अर्थासाठी कोणी डिक्शनरी बघत नाही. आणि बघितली तरी त्यांत तो मिळणार नाही. पण आजोबांचे काही समाधान होईना. मी त्यांना ग्रंथालयात नेले. तिथे ग्रंथपालाने त्यांना संस्कृतचे तीन कोश दाखविले. अर्थ काही मिळाला नाही.

पुढे दोन तिन दिवसांनी ते परत आले. मला म्हणाले 'मला एका कीर्तनकारांनी अर्थ सांगितला. तो मला पटला. पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही म्हणता तशी ती ओळ डू कृञ् करणे अशी नसून मी म्हणतो तशीच डू कृ करणे अशीच आहे.' शंकराचार्यांना हा चरण पुरा करता येत नव्हता. त्यांना इंग्रजी संस्कृत आणि मराठी येत होते. त्यामुळे त्यांनी टु डू, कृ आणि करणे हे एकाच अर्थाचे पण तीन भाषांमधले शब्द एकत्र आणून चरण पुरा केला आणि आपले तीन भाषांवरील प्रभुत्वहि दाखविले!'

मी म्हणालो, 'छान छान! तुमचे समाधान झाले ना? आनंद आहे!' मनांत विचार आला मी त्या वेळी हजर असतो तर त्या इरसाल कीर्तनकाराने हळूच डोळा मारीत मला सांगितले असते 'अहो मास्तर, ज्याची भूक शीखंडपुरीनेच भागते त्याला चुरमुरे देण्यात काय अर्थ आहे?' आणि चुरमुऱ्यांचीच भूक असणाऱ्याला शीखंड पुरी कशाला द्यायची?'

२

मी माझ्या मित्राबरोबर त्याच्या परिचित गृहस्थांना भेटायला त्याच्या बरोबर गेलो होतो. घर म्हणजे प्रशस्त बंगला होता. चारी बाजूंना प्रशस्त बाग होती. बंगल्यात तिघेच होते. ते म्हातारे गृहस्थ, त्यांचा मुलगा आणि सुन. आम्ही गेलो तेव्हा मुलगा सुन यांनीच आमचे स्वागत केले. दोघांचेहि दिसणे आणि वागणेहि कसलीहि छाप न पाडणारे होते. मुलाने वडिल आजारी असल्याची बातमी दिली. त्यांच्या समाचाराला आम्ही आतल्या खोलीत गेलो. त्यांचे ऊं ऊं असे कण्हणे चालू झाले. 'काय म्हणते प्रकति? बरे आहे ना?' मित्राने चौकशी केली. कण्हत आणि खोल घालविलेल्या आवाजात त्यांनी उत्तर दिले 'आता बरे आहे.'

'औषध पाणी घेता ना वेळेवर?'

म्हाताऱ्याने घड्याळाकडे साभिप्राय बघितले आणि सुनेकडे नजर टाकली.

'ऊं' त्यांनी उत्तर दिले.

सुनेने दुसऱ्या खोलीत जाऊन औषधाची बाटली आणली. तिकडे बघत म्हातारा बोलला 'औषध नाही गोळ्या' सून परत आत गेली आणि गोळ्या घेऊन आली. त्यातल्या दोन गोळ्या म्हाताऱ्याच्या हातावर ठेवल्या. त्याने नाराजीने सुनेकडे बघितले. ती लगेच बाहेर गेली आणि भांड्यातून पाणी घेऊन आली.

'पाणी नाही दूध' म्हातारा बोलला. सुनेने पाणी नेऊन दूध आणले.

'गरम नाही केलंस?'

ती परत आत गेली आणि दूध गरम करून घेऊन आली.

'साखर घातलीस'

लगेच साखर घालायला सून गेली. परत येताना मात्र चमचा घालून ढवळत आली!

मला सुनेच्या सांगकामेपणाला हसावे, की म्हाताऱ्याच्या खडूस पणावर संतापावे, की इष्टेटीमुळे अगतिक झालेल्या मुलाची कींव करावी हेंच कळेना.

३

आमच्या गांवात एका गृहस्थांच्या घरी एक गायक आला होता. तो स्वत:ला जितेंद्र अभिषेकींची प्रतिकृति समजायचा. कारण त्याला बघितल्यावर अभिषेकींचा भास व्हायचा यात शंकाच नव्हती. त्यातच तो पोशाख, केसांची ठेवण, हालचाली, अभिषेकींसारख्या करायचा. फक्त त्याच्या आवाजाविषयी मतभेद व्हायचा. आल्या आल्या त्याने तंबोरा कोणाकडे मिळेल याची चौकशी सुरू केली. गावात तो कोणाकडेच नव्हता. त्यामुळे त्याचे रडगाणे सुरू झाले. माझा रियाझ बुडतो आहे. काय पण गांव आहे. साधा एक तंबोरा गांवात नाही? इत्यादि.

आपल्या यजमानांना पुढे करून त्याने आपला एक कार्यक्रम गांवात ठेवायला लावला. रात्री नऊला कार्यक्रम ठरला. लोक गाणी ऐकायला आले. याने आधी पेटीवाला, तबलेवाला यांच्या थोडा नखरा करण्यात वेळ घालवला. मग

*(पृष्ठ १८ वर)*

## प्रतिष्ठान वृत्त
## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वा. कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनींवर संपर्क करून यावे. म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शनिवार दि. १२ सप्टेंबरला दुपारी ४ वा. मराठे अुद्योग भवनात (प्रभादेवी) मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीची सभा भरली. मागील इतिवृत्त वाचन झाले. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रांचे वाचन झाले. कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे यांनी आय-व्यय ताळेबंदातील सुधारणा कार्यकारिणीपुढे सांगितल्या. गुणवत्ता पारितोषिकांसाठी आलेले अर्ज स्विकारले गेले. श्री. मोहनराव मराठे यांना 'जीवनगौरव' पुरस्कार डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते मिळाला त्यासमारंभाचे फोटो श्री. मोहनरावांनी सर्वांना दाखविले. पारितोषिक समारंभ कसा चांगला संपन्न झाला त्याविषयीही सविस्तर सांगितले. (हितगुजच्या मुखपृष्ठावर फोटो दिला आहे)

मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी दि. २५ ऑक्टोबर २००९ला सायंकाळी ५वा. दामले योग केंद्राला आयोजित केली आहे. चहापानानतंर बैठक संपली.

रविवार दि. २५ ऑक्टोबर २००९ला दु. ४.३० वा. मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा दामले योग केंद्र, माटुंगा येथे भरली. सभेला गेल्या वर्षीपेक्षा लक्षणीय अुपस्थिती होती. मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचे कर्नल श्री. प्रमोदन मराठे, सौ. नीलांबरी मराठे, श्री. रमेश मराठे, श्री. विजय मराठे, श्री. मुकुंद मराठे हे कार्यकारिणी सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेला आवर्जून अुपस्थित राहिले आणि त्यामुळे सभा भारदस्त झाली. कर्नल श्री. प्रमोदन मराठे यांनी प्रतिष्ठानविषयीची आतापर्यंतची वाटचाल आणि यापुढे भविष्यातील अपेक्षा आपल्या संक्षिप्त भाषणात व्यक्त केल्या. त्या विचार करायला लावणाऱ्या आहेत. सौ. नीलांबरी मराठे यांनी 'मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेची दैनंदिनी' तसेच लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी घोषित केलेले गुणवत्ता पारितोषिक दिले जाते की नाही याविषयी आणि पुणे वास्तुप्रकल्प याविषयी आपली मते ठामपणे मांडली. श्री. वि.के. मराठे, श्री. लक्ष्मणराव मराठे, श्री. नागेश मराठे यांनी अहवाल संक्षिप्त स्वरुपात लिहिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. कोषाध्यक्षांनी आय-व्यय ताळेबंद वाचून दाखविला. शंकांना समाधानकारक अुत्तरे दिली. गुणवत्ता पारितोषिके टाळ्यांच्या गजरात दिली गेली. यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्रतिष्ठानचे संस्थापक कै. सुरेशभाऊ मराठे यांच्या पत्नी प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या हस्ते गुणवत्ता पारिषोषिक वितरण संपन्न झाले. खमंग बटाटेवडा, गाजर हलवा आणि कॉफी आस्वादाने सभेची सांगता झाली.

शुक्रवार दि.१३ नोव्हेंबरला दुपारी ४वा. मराठे प्रतिष्ठानची सभा मराठे उद्योग भवन, प्रभादेवी येथे भरली. कार्यवाहांनी मागील इतिवृत्त आणि पत्रव्यवहारांचे वाचन केले. या सभेला कर्नाटकातील दुर्ग गावातील (कार्कल) मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष माननीय श्री.विष्णूमूर्ती मराठे सपत्नीक उपस्थित होते. विचारविनिमय झाला. चहापानानंतर सभा संपली. ◆◆◆

---

*(पृष्ठ १७ वरून)*

## माणसे

आत्मचरित्र सांगण्यात वेळ घालवला. मग गाणं कसं ऐकायचं, शांतता कशी पाळायची, कुजबुज करून कलाकाराचा मूड घालवायचा नाही, अशा सूचना देऊन, एकदा गायला सुरुवात केली. एक दोन गाणी झाल्यावर 'सर्वात्मका सर्वेश्वरा' हे नाट्यगीत सुरू केले. त्यांतील 'ऋग्वेद या हृदयात व्हा' हा चरण नको तितका आळवायला लागला. श्रोते अस्वस्थ व्हायला लागले आणि एकदम महादेव डंबे उभा राहिला आणि आपल्या दणकट आवाजांत त्याने विचारले, 'आणि यजुर्वेद कशांत व्हा ?'

४

एका बड्या कॉलेजच्या बड्या होस्टेलमध्ये साडेतीनशे तरी विद्यार्थी रहात होते. त्यांचे दरवर्षी गॅदरिंग होत असे. त्यासाठी सेक्रेटरीची निवडणूक होत असे. एका वर्षी सेक्रेटरीपदासाठी दोन उमेदवार होते. एक उच्चभ्रू हायफाय सोसायटींतून आलेला, भरपूर जनसंपर्क त्यातहि मुलींमध्ये अधिक संपर्क असलेला. पण बुद्धि कर्तृत्व यांत सामान्य असलेला होता. दुसरा गावरान पण बड्या बापाचा आणि गावरान प्रतिभेचा होता. तो अर्थातच हरला पण अधिकृत सेक्रेटरीच्या कार्यात त्याची लुडबुड चालू असायची.

गॅदरिंग कार्यक्रम झाल्यावर दुपारी जेवण चालू होते. वातावरण अत्यंत आनंदी खेळकर होते. सेक्रेटरी आपल्या गावरान प्रतिस्पर्ध्याला म्हणाला, 'बघा आमच्या कारकीर्दीत कसा आनंद चालला आहे. सगळे मेन्युवर खूश होऊन जेवत आहेत.'

गांवरान प्रतिभावंताने ऐकून घेतले. थोड्या वेळाने तो पंक्तीच्या मधोमध उभा राहिला आणि जोरात ओरडला 'ऐका. तुम्ही खात असलेल्या बटाटेवड्यात एक चार आण्याचे क्वाईन घातलेले आहे. ते ज्याला मिळेल त्याला धा रुपयांचं बक्षिस सेक्रेटरी देतील. त्यांच्याकडे ते आणून द्यावे.' लगेच सगळेजण वडे दाबून, फोडून, बघायला लागले. सेक्रेटरी गडबडला. त्याच्याकडे येत प्रतिस्पर्धी म्हणाला, 'बगा राव, सगळे कशी तुमची कारकीर्द चिवडत बसलेत.'

**श्री. अ.द. मराठे**
१०, शांतिनाथ अपार्टमेंट,
१६८ यशवंत नगर, तळेगांव दाभाडे,
जि. पुणे-४१० ५०७

◆◆◆

# वेद आणि पुराणांतील श्रीदत्तात्रेयांचे वर्णन

**- डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०)**

**महाराष्ट्रातील एक प्रमुख उपासना म्हणून दत्तोपासनेकडे आपणांस बोट दाखविता येईल. महाराष्ट्रात वारकरी पंथाच्या खालोखाल दत्तसंप्रदायाला फार महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रात घरोघरी दत्ताची उपासना होतांना आढळते.**

**भारतीय संस्कृतीची पाळेमुळे ''श्रुति-स्मृति-पुराण'' या साहित्यामध्ये खोलवर रुजलेली आहेत. भारतीय मानस प्रत्येक गोष्टीचा उगम वेदामध्ये पहात असते. पौराणिक आख्यानांचे मूळ म्हणजे ऋग्वेद! ज्या अत्रिकुळात श्रीदत्तात्रेयाने जन्म घेतला ते अत्रिकूळ वेदांमध्ये गौरविले गेले आहे. श्रीदत्तात्रेयांचे प्राचीनत्व वेद पुराणांतून स्पष्ट होते. श्रुति-स्मृति-पुराणे-महाभारतात-भागवतादि ग्रंथांनी भारतीय जीवनावर प्रचंड प्रभाव पडला असून भारतीय इतिहास, संस्कृती आणि वाङ्मय यांना समृद्ध केले आहे. अशा या वेद-पुराणांतील श्रीदत्तात्रेयांचे वर्णन करणारा हा लेख, दत्तोपासकांना निश्चितच उद्बोधक ठरेल.**

**- संपादिका**

ब्रह्मदेवाच्या अष्टमानस पुत्रांपैकी मानले गेलेले अत्रि हे एक सुविख्यात ऋषी होत. अत्रिंपासून प्राचीन काळात ब्राम्हणांची एक परंपरा निर्माण झाली. ऋग्वेदातील अनेक सूक्तांचे प्रणयन करणारा वैदिक सूक्तद्रष्टा या नात्याने ऋग्वेदात अनेक ठिकाणी त्यांचा उल्लेख होत असतो. एक अत्यंत लोकप्रिय आणि विद्वान ऋषी म्हणून अत्रिंचा ऋग्वेदात निर्देश झालेला आढळतो. उदाहरणच द्यायचे तर, आश्विनीकुमार - पराक्रमसूक्तात (ऋग्वेद १ = ११६:८) ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील ११६व्या सूक्तात, म्हटले आहे: ''हे आश्विनीकुमारांनो, अग्निकुंडात दग्ध होणाऱ्या अत्रीऋषींची शरीरपीडा शीतल उपचारांनी आणि पुष्टिकारक अन्नाने तुम्ही बरी केलीत, आणि त्यांच्या कुटुंबाचे कल्याण केले.''

मानव जातीचा पूर्वज जो मनु त्यांच्या समवेतही अत्रीऋषींचा उल्लेख आढळतो. अग्नीचा आणि अत्रींचा प्राचीन काळापासून संबंध आलेला दिसतो. कारण अत्रींना साहाय्य केल्याचा निर्देश ऋग्वेदात होताना दिसतो. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडलातील ४५साव्या अग्निसूक्तात म्हटले आहे, ''प्रियमेध, अत्री, विरूप, अंगिरस आदि प्राचिन ऋषींच्या हाकेसरशी धावून जाणाऱ्या हे जातवेदस, महाव्रत अग्ने, आज तू माझी प्रार्थना ऐक.'' (१.४५.३)

याच अत्रीऋषींनी स्वर्भानु दैत्याचा नाश करून पृथ्वीला पुन: सुर्य प्राप्त करून दिल्याची



कथा ऋग्वेदात सांगितली जाते. (ऋग्वेदाचे ५वे मंडल ४० वे सूक्त आहे) ती अशी, 'हे सूर्या, अंध:कार रुपी स्वर्भानु (राहु) असुराने तुला ग्रासताच मनुष्यमात्र वेड्यासारखे झाले. आपण कोठे आहोत हे त्यांस समजेना. स्वर्भानुचे हे आकाशीय कपट नष्ट करणाऱ्या हे सामर्थ्यसंपन्न इंद्रा, व्रतभ्रष्ट अंध:काराने त्र्यस्त झालेला सूर्य, अत्री ऋषींनी तुरीय यंत्राच्या साहाय्याने आकाशात पाहिला.

सूर्य म्हणतो, एकमेव मित्र अशा हे अत्रे, वरुणराजा आणि तू मिळून माझे रक्षण करा. दुष्ट स्वर्भानु दैत्याच्या पीडेपासून तुम्ही माझे कायमचे रक्षण करा. स्तोत्रवेत्या आणि सोमनष्पादक अत्री ऋषींनी स्वर्भानु दैत्याचा नाश केला. पृथ्वीला सूर्याची पुन:एकवार अंतरिक्षात स्थापना केली अन्य कोणीही हा पराक्रम करू शकले नाही.

अशा रीतीने वेदांमध्ये श्रीदत्तात्रेय ज्या कुळात जन्मले त्या कुळाची माहिती मिळत असली तरी श्रीदत्तात्रेयांबद्दल मात्र माहिती मिळत नाही. त्यासाठी आपणांस प्रामुख्याने पुराणांकडेच वळावे लागते. पुराणांप्रमाणेच महाभारतामध्येही श्रीदत्तात्रेयासंबंधी आपणास माहिती मिळू शकते.

अष्टादश प्रमुख पुराणांच्या क्रमाच्या दृष्टीने विचार केल्यास, ब्रह्मपुराण, पद्मपुराण, विष्णुपुराण, विष्णुधर्मोत्तर, वायु, श्रीमद्भागवत पुराण, मार्कण्डेय पुराण, अग्निपुराण, भविष्य, कूर्म, मत्स्य, ब्रह्मांड या क्रमाने श्रीदत्तात्रेयासंबंधी जी माहिती मिळते त्या माहितीच्या संकलनातून, पारिशीलन केले असता श्रीदत्तात्रेयांचे संपूर्ण चित्र आपल्यापुढे उभे राहू शकते.

ब्रह्मपुराण - अठरापुराणांमधील 'ब्रह्मपुराण' हे आद्यपुराण होय. या पुराणात सर्व प्रथम श्रीदत्तात्रेयाचा उल्लेख झालेला आढळतो. देवांच्या आशीर्वादाने दत्तात्रेय, सोम, दुर्वास हे तीन पुत्र आणि शुभात्रेयी नावाची एक कन्या अत्री ऋषींना प्राप्त झाली, असे हे पुराण म्हणते.

*अत्रीराराधयामास ब्रह्माविष्णु महेश्वरान्।*
*तेषु तुष्टेसु सप्राह पुत्रायूयं भविष्यथा।।२।।*
*तया चैका रुपवती कन्या मम भवेत्सुरा:।*
*।था पुत्रत्वमापुस्ते ब्रह्माविष्णु महेश्वरा:।।३।।*
*कन्यांच जनयामास शुभाऽऽत्रेयीतिनामत:।*
*दत्त:सोमोऽथ दुर्वासा: पुतासस्थ महात्मन:।।४।।*

या उल्लेखांवरून पाहता, ब्रह्मापुराण रचनाकारांच्या मनात श्रीदत्त हा अत्रिंचा, अन्य पुत्रांसारखाच एक पुत्र होता, अशी कल्पना असावी. याच ब्रह्मपुराणाच्या ११७व्या अध्यायामध्ये 'आत्मतीर्थ' नावाचे तीर्थाचे वर्णन येते येथे श्रीदत्ताचे जे चित्र ब्रह्मपुराणकारांनी आपल्यासमोर उभे केले आहे ते अवतारी पुरुषाचे नसून एका सामान्य साधकाचे अथवा उपासकाचे दिसून येते.

श्रीदत्ताने अत्रिंना ब्रह्मज्ञानाविषयी विचारले असता अत्रिंनी श्रीदत्तांना 'तू गौतमी तटावर जाऊन शंकराची आराधना कर म्हणजे शंकर प्रसन्न होऊन

तुला ब्रह्मज्ञानप्राप्ती करून देतील'. तेव्हा अत्रिऋषींच्या सांगण्यावरून दत्त गौतमी तीरावर गेले तेथे स्नान करून, शुचिर्भूत होऊन हात जोडून त्यांनी शंकराची प्रार्थना केली.

मोह, भय आणि दु:ख यांनी भरलेल्या संसाररूपी विहीरीत मी बुडतो आहे तेव्हा देवा यातून मला तारा. माझे रक्षण करा. अज्ञानरुपी अंधार समोर पसरला आहे, पंचेद्रियांच्या वासनेत मी गुरफटलो आहे, अडकलो आहे. दारिद्र्याने आणि अनेक प्रकारच्या रोगांनी मी बांधून गेलो आहे. जखडलो आहे मृत्युरूपी भुजंगाने मला वेटोळे घातले आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षडरिपु मला छळत आहेत. धर्म आणि भक्ती माहित नसलेल्या मला, हे सोमनाथा! आत्मज्ञान, मुक्ती दे! कारण तू करुणाकर आहेस. अपराध पोटात घालणारा कनवाळू, सर्व जगाचा कारुण्यनिधी आहेस. तेव्हा गौरीपते, शंकरा, सोमनाथा मला आत्मज्ञान प्राप्ती होऊ दे. या प्रार्थनेमुळे श्रीशंकर दत्तावर संतुष्ट होऊन त्यांनी दत्ताला वर दिले. आत्मज्ञान आणि मुक्ती दिली. अशी कथा आत्मतीर्थ आख्यानातून ब्रह्मपुराणात आलेली दिसते. याठिकाणी संसारतापाने, दारिद्र्याने, रोगाने, षडविकारांनी पिडलेला अत्रिसुत दत्त शंकराला याचना करीत आहे. दत्ताने केलेली ही याचना एका सामान्य माणसासारखीच आहे. परंतु पुढे याच ब्रह्मपुराणात २१३व्या अध्यायातील वर्णनांवरून आत्मज्ञान लाभलेला अत्रेय 'श्रीदत्त' एक महान सिद्धपुरुष झाला होता असे दिसते. या महात्म्याने वैदिक धर्माचे पुनरुत्थापन केले यासंबंधात ब्रह्मपुराण म्हणते -

''भूयो भूतात्मनो विष्णो: प्रादुर्भावो महात्मन:।

दत्तात्रेय इति ख्यात: क्षमया परयायुत:।।१०६।।

तेन नष्टेषु वेदेषु प्रक्रियासु मखेषुच।

चातुर्वर्ण्येच संकीर्णे धर्मे चाकुलतां गते।।१०७।।

अतिवर्धति चाधमें सत्य नृष्ट ऽनृते स्थिते।

प्रजासु शीर्यमाणासु धर्मे चाखुळता गते।।१०८।।

संयज्ञा: सक्रिया: वेंदा: प्रत्यावीता हि कु तेन वै।

चार्तुवर्ण्यमसंकीर्त कृतं तेन महात्मना।।१०९।।''

विष्णुच्या प्रसादामुळे 'दत्तात्रेय' नामक महात्मा जन्मास आला. तो क्षमाशील होता. वेद नष्ट झाले होते, यज्ञसेस्था लोप पावूं लागली होती, चातुर्वर्ण्य शिथिल होऊन वर्णसंकर होऊ पहात होता. धर्माची पकड सैल झाली होती. सत्य नष्ट होऊन 'अनृत' म्हणजे असत्यास प्रतिष्ठा लाभू पहात होती आणि 'अधर्म' मान्यता पावूं पाहात होता, हे सर्व दोष दूर करून दत्तात्रेयाने पुन: वेद, चातुर्वण्य, धर्म, यज्ञ यांना मान्यता मिळवून देत धर्माचे शौथिल्य दूर केले, असा या श्लोकांचा मतितार्थ आहे.

श्रीदत्त हे सिद्ध महात्मे असल्यामुळे त्यांना वर देण्याचे सामर्थ्य लाभले होते. सहस्राबाहू कार्तवीर्याला त्यांनी १) सार्वभौमत्व व उत्तम प्रकारे राज्यशासन २) युद्धात सहस्त्र बाहूंची उत्पत्ति ३) अधर्मापासून परावृत्त करण्यास सज्जनांचा सदुपदेश ४) वरिष्ठ योद्धाच्या हातून मृत्यू हे चार वर दिले होते याची कथा ही ब्रह्मपुराणात येते (अ.२१३ श्लोक ११०-१११-११२)

यानंतरचे दुसरे पुराण आहे 'पद्मपुराण'. या पुराणातून दत्तात्रेयाच्या संबंधात ऐलपुत्र आयुचे नवीन कथानक कथन केलेले आहे. तसेच कार्तवीर्य कथा आहे. पद्मपुराणाच्या द्वितीय भागात, भूमिखंडामध्ये ही कथा येते. आयु निपुत्रिक होता म्हणून त्यास खूप दु:ख होत होते. आपणास पुत्रप्राप्ती व्हावी म्हणून त्याने खूप प्रयत्न केले पण यश येईना. शेवटी तो श्रीदत्तात्रेयाला शरण गेला, श्रीदत्ताची १०० वर्षे अविचल मनाने सतत भक्ती केली श्रीदत्त प्रसन्न होऊन, संतुष्ट होऊन त्यांनी पराक्रमी पुत्र होईल असा वर दिला. त्याप्रमाणे आयुस नहुष नावाचा मुलगा झाला ज्याने हुंडा नावाच्या दैत्याचा वध केला. दत्तात्रेयाचा या वराचा उल्लेख पद्मपुराणकार असा करतात.

''दत्तात्रेयो मुनिश्रेष्ठ साक्षात् देवो जनार्दन।

सृश्रुषितो मया देवि त्वयाच तपसा पुरा।''

(अ.११६ श्लोक २६) याठिकाणी दत्तात्रेय मुनिश्रेष्ठ असून साक्षात जनार्दनाप्रमाणे होते, असे म्हटले आहे.

पद्मपुराणात कार्तवीर्य कथा व वरील चार वर त्यांचा उल्लेख येतो.

विष्णुपुराण-विष्णुधर्मोतर पुराण-विष्णु पुराणाचे आदिभाग व उत्तरभाग असे दोन भाग असून आदिभागांत ६ अंश आहेत व उत्तर भागास 'विष्णुधर्मोत्तर' म्हणतात. विष्णुपुराणाचा पूर्वभाग व विष्णुधर्मोत्तर मिळून संपूर्ण विष्णुपुराणाचा पूर्वभाग व विष्णुधर्मोत्तर मिळून संपूर्ण विष्णुपूराण २३००० चे होते. हल्ली विष्णुपुराण व विष्णुधर्मोत्तर हे भिन्न भिन्न ग्रंथ मानले जातात. विष्णुपुराणाचा पूर्वभाग जवळजवळ ७००० श्लोकांचा आहे. शंकराचार्यांचे वेळी, विष्णुपुराण व विष्णुधर्मोत्तर हे एकाच ग्रंथाचे भाग आहेत अशी कल्पनाही नव्हती, तर ते स्वतंत्र ग्रंथ आहेत अशी समजूत होती, पण नारदपुराणातील उपलब्ध सूचीवरून हि दोन्ही ग्रंथ स्वतंत्र नसून एकच आहेत. विष्णुधर्मोत्तर हा विष्णुपुराणाचाच भाग आहे, हे स्पष्ट होते. आज फक्त विष्णुपुराणाचा पूर्वभाग मिळतो त्याची संख्या ७००० श्लोक आहे. विष्णुधर्मोत्तर १६०० चे मिळते. कार्तवीर्यांचे वर दोन्ही पुराणात उल्लेख आहेत. विष्णुधर्मोत्तर पुराणात कार्तवीर्याने दत्तात्रेयाकडून प्राप्त झालेल्या वराचे बळावर राज्य हतकंटक बनविले आणि आर्यावर्तातील भूमी 'निर्लेच्छ' केली. ''आर्यावेर्तषु निर्म्लेच्छा कृतातेन वसुन्धरा'' असे म्हटले आहे.

वायुपुराण-कालक्रमानुसार विष्णुपुराणा नंतर वायुपुराण निर्माण झाले. त्यातही कार्तवीर्यकथावरांचा उल्लेख येतो. कार्तवीर्याच्या वैभवशाली राज्याचे वर्णन येते. सहस्त्रयज्ञ केले गेले. त्याच्या यज्ञाचा वेदिकासुवर्णाच्या व यज्ञमंडपाचे खांब कांचनाने बनविले होते. यज्ञप्रसंगी सर्वदेव, अप्सरा, गंधर्व विमानांनी नटून थटून येत असे वर्णन आहे. आपल्या कीर्तिने कार्तवीर्य अजून त्रिभुवनात चमकत होता.

श्रीमद्‌भागवत पुराण - आनुसूयेने मागितलेल्या वरामुळे आत्रिंना दत्तात्रेय हा परमेश्वराचा सहावा अवतार म्हणून प्राप्त झाला त्याने अलर्क व प्रल्हाद यांना ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला असा उल्लेख प्रथमरंकध तिसऱ्या अध्यायात येतो. ''षष्ठे अत्रेरपत्यत्वं ऋत: प्राप्तोऽनसूयया! आन्वीक्षिकी मलर्कांयं प्रल्हाददादी उचिवान्।।११।।''

श्रीमद्‌भागवतपुराणाच्या चतुर्थस्कंधात पहिल्या अध्यायात दत्तात्रेय जन्म कथा पुढील प्रमाणे सांगितली जाते. आत्रीऋषीस अनुसूयेपासून तीन पुत्र झाले. त्यापैकी दत्तात्रेय एक - आत्रिमुनींनी पुत्र प्राप्तीसाठी ऋक्ष्यकुल पर्वतावर घोर तपश्चर्या केली. या घोर तपाने त्याच्या मस्तकांतून ज्वाला निघू लागल्या व त्या ज्वालांमुळे त्रैलोक्याचा दाह होऊ लागला. तेव्हा सर्व देव तेथे आले आणि त्यांनी ब्रह्मा विष्णु व महेश यांचा अंशरूप पुत्र तुला होईल, असा वर दिला. त्यामुळेच हा वैवस्वत मन्वंतरात दुसऱ्या युगांत ब्रह्मा, विष्णु व महेश यांच्या अंशाने

अत्रीस प्राप्त झाला. ब्रह्मा सोमरूप, विष्णु दत्तात्रेय आणि रुद्र दुर्वासरूप तीन मुले झाली.

श्रीमद्‌भागवताच्या चतुर्थस्कंधात १९व्या अध्यायात दत्तात्रेयांचा उल्लेख आढळतो. पृथु राजाने १०० अश्वमेघ यज्ञ केले, त्या यज्ञमहोत्सवी स्वत: भगवान विष्णु उपस्थित होते. विष्णुच्या बरोबर दत्तात्रेय, नारद व कपिल इ. योगेश्वरही होते. 'कपिलो नारदो दत्तो योगेशा: सनकादय:।'

श्रीमद्‌भागवताच्या नवमस्कंधात, इतर पुराणांतील कथेप्रमाणेच हैहयाधिपति सहस्रनार्जुनाची कथा आलेली आहे.

**मार्कण्डेय पुराण** - पुराणांच्या क्रमाच्या दृष्टीने पाहता, ब्रह्मपुराण, पद्मपुराण, विष्णुपुराण, विष्णुधर्मोत्तर पुराण, वायु पुराण, भागवत पुराण आणि त्यानंतर मार्कण्डेय पुराणाचा क्रम लागतो. मार्कण्डेय पुराणातील १६व्या अध्यायात दत्तजन्माचे नवीनच कथाख्यान आलेले आहे ते असे-

प्रतिष्ठान नगरांत कौशिक नावाचा एक ब्राह्मण राहत असे. तो वर्णानेच केवळ ब्राह्मण होता, त्याची पत्नी साध्वी व पतिव्रता असून देखिल तो नित्य वेश्या समागम करी. पत्नीची त्याला पर्वा वाटत नव्हती. कालांतराने त्याला कुष्ठरोग होऊन क्रमाने त्याची गात्रे सडूं झडूं लागली. त्यासरशी वेश्येने त्याच्याकडे पाठ फिरवली. तिने हाकून दिल्यावर आणि कुठेच आसरा मिळेनासा झाल्यावर त्याला पत्नीची आठवण झाली आणि तो घरी आला. त्याची किळसवाणी अवस्था पाहूनही त्याच्या पत्नीने त्याची घृणा न करता त्याची सेवा चालविली ती इतकी सेवापरायण, साध्वी असूनही कौशिकाच्या मनात मात्र तिच्याविषयी मुळीच स्नेहभाव नव्हता. त्याच्या ध्यानी मनी त्या वेश्येचे ध्यान असे.

एक दिवस कौशिकाने आपल्या पत्नीला त्या वेश्येच्या घरी आपणांस घेऊन जायला सांगितले. ती साध्वी त्याला घेऊन रात्रीच्या वेळी अंधारातून वाट चालू लागली. त्याच नगरांत चुकीने चोर समजून मांडव्यऋषींना सुळावर चढविले होते. शनिमहात्म्यात ही कथा आहे. मांडव्यऋषी ध्यानानिष्ठ होऊन सूळावरच यातना सहन करीत होते. ही सती अंधारातून कौशिकाला घेऊन जात असता, मांडव्यऋषींना त्याचा पाय लागला. कौशिकाचा पाय लागला तेव्हा ऋषिंनी त्याला शाप दिला, ''सूर्योदय झाल्याबरोबर तू मरशील''

कौशिकपत्नीने आपल्या पतिला वाचविण्यासाठी सतीत्वाच्या प्रभावाने सूर्योदयच थांबविला. त्यामुळे संपूर्ण विश्वचक्रात बिघाड झाला. देव घाबरून ब्रह्मदेवाकडे गेले आणि ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून सती अनसूयेला मध्यस्थी करण्यास सांगितले. अनुसूयेने कौशिक पत्नीला अभयाचे आश्वासन देऊन सूर्योदय घडवून आणला. मांडव्याच्या शापामुळे कौशिक मृत्यू पावला, परंतु अनुसूयेने त्याला जिवंत केले. अनुसूयेच्या या कार्यामुळे संतुष्ट झालेल्या देवांनी तिला वर मागण्यास सांगितले. तेव्हा तिने माझ्या पोटी ब्रह्मा, विष्णु व शिव पुत्ररुपाने जन्मा यावेत. त्याप्रमाणे देवांनी अनुसूयेला वर दिले आणि सोम, दत्त, दुर्वास हे आत्रिपुत्र निर्माण झाले.

मार्कण्डपुराणाच्या १८व्या आणि १९व्या अध्यायात कार्तवीर्यकथा अशी आहे.

अग्निपुराण - अध्याय २७५ श्लोक १ ते ७ - अध्याय २७५ मध्ये आपल्या एकनिष्ठ सेवेने कार्तवीर्याने दत्तात्रेयास संतुष्ट केले, त्याची अप्रतिम निष्ठा पाहून दत्ताने त्यास वर मागण्यास सांगितले. कार्तवीर्याने ४ वर मागितले ते दत्तात्रेयांने दिले.

**भविष्यपुराण** - नारदाने केलेल्या अनुसूयेच्या सतीत्वाच्या गौरवामुळे ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या पत्नीच्या मनात (सावित्री, रमा, उमा) अनुसूयेविषयी असूया निर्माण झाली. अनुसूयेचे सत्वहरण करण्याच्या हेतूने त्यांनी आपल्या पतींना अतिथिवेषाने तिच्याकडे पाठविले. त्यावेळेस आश्रमांत अत्री नव्हते. अनुसूयेने अतिथिंना विसावण्याची विनंती केली. परंतु सत्वहरणाच्या हेतूने आलेल्या देवांनी तिला सांगितले की, ''तू विवस्त्र होऊन भोजन वाढत असशील तरच आम्ही भोजन स्वीकारू'' अनुसूयेने ते मान्य केले आणि ती विवस्त्र होऊन वाढू लागणार तोच तिन्ही देवांची लहान बाळे बनली. इकडे पतींची वाट पाहून देवभार्या शीणल्या, थकल्या, पतिशोधार्थ अत्रीऋषींच्या आश्रमात आल्या, पाहतात तो अनुसूयेने आपल्या पतींची तीन बालके बनविली आहेत.

देवाभार्यांची ही विकलावस्था पाहिल्यावर अनुसूयेने देवांना पुन्हा पूर्वरूप दिले. पूर्वरुप प्राप्त झाल्यावर अनुसूयेच्या सत्वसाक्षात्काराने चकित झालेल्या देवांनी तिच्या इच्छेनुसार तिच्या उदरी जन्म घेण्याचे मान्य केले हीच कथा भविष्यपुराणात १७व्या अध्यायात श्लोक ६७ ते ८२ मध्ये आलेली दिसते. या कथेतील विकृताचार ७१ ते ७३ श्लोकांमध्ये वर्णिलेला आहे.

येथपर्यंत जी पुराणे आपण पाहिली त्या कोणत्याही पुराणात दत्तात्रेयासंबंधी अशी कथा येताना दिसत नाही. अनुसूयेने विवस्त्र होऊन अतिथिंना भोजन वाढल्याची कथा समाजात खूपच रुजलेली दिसते. या कथे्चे मूळ भविष्यपुराणातूनच आढळते, असे म्हणता येते. साहजिकच या पुराणात उगम पावलेली ही कथा पुढे अनेक ठिकाणी अवतीर्ण होताना दिसून येते. सरस्वती गंगाधराच्या श्रीगुरुचरित्रातूनही ही कथा अध्याय ४ ओव्या १२ ते ७० यात सांगितली आहे. प्राचीनतेच्या दृष्टीने पाहता भविष्यपुराण बरेच अर्वाचिन दिसत असून त्यात प्रक्षिप्त भागाचीही भर पडलेली आहे. त्यामुळे अनुसूयेची ही कथा किती विश्वसनीय मानावी असा प्रश्न पडतो.

**कूर्मपुराण** - कूर्मपुराणाच्या १३व्या अध्यायातून, अत्रीऋषींची पत्नी अनुसूयेच्या पोटी विष्णु, शिव, ब्रह्मा ह्यांनी पुत्ररुपाने जन्म घेतला आणि त्यांची नावे सोम, दुर्वास व श्रीदत्त होती तसेच अनुसूयेला स्मृति नावाची एक कन्याही झाली असे म्हटले असून या तीन पुत्रांना ''योगी'' असे संबोधिलेले आढळते.

त्याचप्रमाणे कुर्मपुराणाच्या २२व्या अध्यायातून कार्तवीर्याच्या कथेचा उल्लेख होताना आढळतो. मात्र श्रीदत्तात्रेयाने कार्तवीर्याला दिलेल्या चार वरांचा उल्लेख होत नाही. त्याचा मृत्यु परशुराम, जन्मदग्नीपुत्राकडून झाल्याचे म्हटले आहे.

मत्स्यपुराण - त्रेतायुगाच्या प्रारंभी श्रीदत्तात्रेयावतार झाल्याचे मत्स्यपुराणकार म्हणतात. श्रीदत्तात्रेयांच्या संदर्भात कार्तवीर्यकथेचा संदर्भ येताना आढळत नाही. मत्स्यपुराणाच्या १००व्या अध्यायात पुढील उल्लेख होताना दिसतो. 'दशावतार रुपाणि प्रतिमासं क्रमान्मुने। दत्तात्रेयं तथा व्यासमुत्पलेन समान्वितम्।।श्लोक१४वा'

श्रीदत्तात्रेयांना आणि श्रीव्यासांना मत्स्यपुराणाच्या काळात दशावतारां इतकीच प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. मत्स्य पुराण हे प्राचीन पुराण समजले जाते आणि श्रीदत्तात्रेयांना दिव्यत्व अतिप्राचीन काळापासून प्राप्त झाले होते हे स्पष्ट होते. **ब्रह्मांडपुराण** - ब्रह्मांडपुराण हे पुराणांच्या मालिकेतील शेवटले पुराण होय. त्यामुळे या पुराणांपूर्वी झालेल्या सर्व पुराणांची माहिती ब्रह्मांड पुराण कर्त्यांना अवगत असणार यात शंकाच नाही. त्यामुळे ब्रह्मांडपुराणात आत्री ऋषी आणि त्यांचा वंश यांच्याबद्दल विस्तृत माहिती आढळते.

◆◆◆

पद्यावली बाबत थोडी पूर्वपिठीका

वास्तविक प्रसिद्धी पासून मला दूरच रहावेसे वाटते, तरी पण दत्तभक्ती चालू असल्याने सदर पद मी अंत:करण पूर्वक महाराजांनी जे दाखविले ते माझ्या गळ्यानी गाईले, त्यानीच कुरवपूरला जाण्या अगोदर २८ तास अगोदर पहाटे ४ वाजता मजकडून लिहून घेतले तो दिनांक ३-६-२००८. ५-६-२००८ रोजी कुरवपूरला पोचलो. सर्व काही श्रीपाद श्रीवल्लभांचे

*दिसू लागले दिसू लागले कुरवपूर*
*कृष्णा माईच्या काठावर!*
*प्रवाहातून अलगद आलो सुंदर बेटावर*
*माऊलीच्या सहवासाने माती झाली गंधीत*
*कृष्णामाईच्या जलातून पद पक्षाळीले मी आज!*
*पुण्य भूमिच्या पृष्ठावर प्रथम ठेवीले पाऊल*
*अन् देहानीमी लोटांगण घातले खास!*
*गंधीत माती भाळावरती लाविली मी आज*
*पुनित जाहलो गुरुदेव मी आपल्या वास्तव्यात*
*वृक्षवेली शिळा माती हितगूज करु लागली*
*अन् वाऱ्याच्या त्या झुळके सरशी जाणे येऊ लागले मनात!*
*हरवून बसलो मी देहाला, गुरुदेव मी पाहिले साक्षीला!*
*पारायणाचा तो सोहळा, अभिषेकाची जलधार*
*जपमाळ ती फिरे सरसर, पालखिचा अत्योल्हास*
*पदमालेची गोड सूरावट*
*दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा!*
*दिवाळी अन् दसरा मनांत भरला मोर पिसारा*
*तल्लीन मी झालो राया, देहभान विसरली काया*
*सांग मला तू देशिल कारे हे सारे भोगाया!*
*जन्माचाहा खेळ मांडला कुठवर देशिल थारा*
*आता मजला निरोप द्याना - ऋणात राहूदे देहाला*
*दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा*
*नामस्मरणाने स्नान घातले मनाला!*

◉◉◉

सदर पद जे गुरुदेव मी पाहिले साक्षीला त्याची निर्मिती १८.७.२००८ गुरुपौर्णिमेस करून घेतली.

*तुम्हास मी पाहिले - पाहिले गुरुदेव मी पाहिले*
*पिंपळकट्टा विशाल मोंठा तेथेच मी पाहिले*
*पाहिले गुरुदेव मी पाहिले !*
*शिष्य गण सभोती- तेथेच मी पाहिले*
*पाहिले गुरुदेव मी पाहिले!*
*एकक्षणभर अचूक दर्शन....*
*नयनी साठविले, तुम्हास मी पाहिले*
*पाहिले गुरुदेवमी पाहिले*
*ऋषि मुनीसम आपुली कांती*
*तेजच झळके सूर्य प्रकाशी*
*डोळे मिटले तरी ही दिसती*
*हृदयी साठविले - तुम्हास मी पाहिले*
*पाहिले गुरुदेव मी पाहिले!*

**- श्री.अशोक मराठे**

## सहवेदना

### श्रीमती सुमन वामन मराठे यांचे निधन

दि. ३०ऑगस्ट २००९ला वरळी, (मुंबई) येथील श्रीमती सुमन वामन मराठे यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले. त्यांच्या घरातील गॅससिलिंडरच्या गळतीमुळे स्फोट झाला. त्यात त्या भाजल्या. त्यांना हिंदुजा हॉस्पिटलात दाखल केले होते. त्यांना दोन विवाहित मुली आहेत. त्यांचे पती कै. श्री. वामनराव हे मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ होते. कुलवृतांतासाठी त्यांनी मदत केली होती. मराठे प्रतिष्ठानचे ते पहिले कार्यवाह होते.

मराठे प्रतिष्ठानच्या द्वारा कै. सुमनताईंना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

### सौ. मालिनी जयंत गोखले यांचे निधन

सौ. मालिनी जयंत गोखले (पूर्वाश्रमीच्या मालिनी सीताराम मराठे) यांचे ९.११.२००९ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्या ६८ वर्षाच्या होत्या. त्यांच्या मागे पती, २ विवाहीत मुली व १ विवाहीत मुलगा आणि नातवंडे असा परिवार आहे. पुणे शाखेच्या कार्यकारीणीचे सदस्य श्री. मुकुंद सीताराम मराठे (२३वे घराणे, नेवरे) यांच्या त्या जेष्ठ भगिनी होत्या.

### सौ. विमल विष्णू केळकर यांचे निधन

श्री.अच्युत महादेव चक्रदेव, पुणे यांची थोरली बहीण सौ. विमल विष्णू केळकर (प्रभावती महादेव चक्रदेव) हिचे दि. २९.८.२००९ या दिवशी असाध्य व्याधीने दु:खद निधन झाले. तिचे वय अठ्याहत्तर होते.

अत्यंत प्रेमळ परंतु निग्रही स्वभाव, सर्वांशी मिळून मिसळून वागणारी, कष्टाळू ही तिची स्वभाव वैशिष्ट्ये होती.

तिचे मागे पति, दोन विवाहीत मुली व एक विवाहीत मुलगा असे कुटुंबीय आहेत.

## मानसन्मान



**कु. राधिका महेश मराठे**

मुलुंड (घराणे ७२वे, गोमांतक)

हिने फेब्रुवारी २००९ मधे झालेल्या अुच्च माध्यमिक परीक्षेला ८५.६६ टक्के गुण मिळविले. यापुढे बी.कॉमच्या पदवी परीक्षेचे शिक्षण ती पूर्ण करणार आहे. तसेच सी.ए.ची प्रवेश परीक्षा ती देत आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. राधिका हिचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील शैक्षणिक कारकीर्दीसाठी मराठे कुलबांधवा तर्फे शुभेच्छा.

◆◆◆



**चि. आदित्य दिलिप लेले** (पृ.४९३)

(घराणे क्रमांक ६७)

मार्च २००९च्या दहावीच्या परीक्षेत चि. आदित्यने ९५.८४ टक्के गुण मिळवून अुज्वल यश संपादन केले. चि. आदित्य हा देवगड तालुक्यातील मुटाट हायस्कूलचा विद्यार्थी आहे. सध्या पुणे येथील गरवारे महाविद्यालयांत ११वी विज्ञान शाखेचे शिक्षण तो घेत आहे. वेंगुर्ले तालुक्यातील तुळसचे श्री. परशुराम के. मराठे यांची कन्या सौ. अनुपमा (सौ. दीप्ती) हिचा आदित्यहा हुषार मुलगा आहे. मराठे प्रतिष्ठान द्वारा चि. आदित्यचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा.

◆◆◆

**कु. ऋता संजय करमरकर** (पृ.५२०)

हिने रसायनशास्त्र विषयात बी.एस.सी. परीक्षा ७३.७५ टक्के गुण मिळवून अुत्तम यश प्राप्त केले आहे. श्रुती संजय करमरकर माहेरवाशीण सभासद यांची ऋता ही कन्या असून, 'हितगुज'चे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मणराव मराठे यांची नात आहे. मराठे प्रतिष्ठान द्वारा कु. ऋताचे हार्दिक अभिनंदन पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा.

◆◆◆

**कु. मानसी माधव मराठे** हिने अुच्च माध्यमिक परीक्षेत कॉमर्स मधे ६०० पैकी ५२२ गुण मिळवून अुत्तम यश प्राप्त केले आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. मानसीचे हार्दिक अभिनंदन पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा.

◆◆◆

**सांगलीचे श्री. वि.म. मराठे** (पृ.२३५) यांच्या 'लाचेची वाटचाल' या विनोदी कवितेस दै. लोकमतच्या दिवाळी अंकात विनोदी कवितांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. मराठे प्रतिष्ठान द्वारा वि.म. मराठे यांचे हार्दिक अभिनंदन.


### सुविचार

मित्राचा स्नेह टिकवून धरायचा असेल तर तीन गोष्टी कटाक्षाने टाळा.

१. वादविवाद २. द्रव्याची याचना ३. त्याच्या प्रिय पत्नीशी गप्पा मारण्याचा मोह.

◉◆◉◆

**लबाडी ही तोकड्या चादरीसारखी आहे, तोंडावर ओढून घेतली की इकडे लगेच पाय अुघडे पडतात.**



**श्री.दत्तात्रेय आत्माराम मराठे**

**(पृ.३३६)**

My grandfather **Dattatraya Atmaram Marathe** is a subscriber to Harmony. Moreover, I believe he exemplifies the spirit of the magazine. He began to swim regularly after he turned 65. Since then, he has participated in many swimming competitions and emerged with flying colours in his age group. His accolades include silver in the 50-m freestyle in the state-level veterans swimming championship in 1997 in Nagpur and the 36th YMCA annual swimming gala in Mumbai in 2008; two golds in the 50-m freestyle and breaststroke at the 5th National Masters Aquatic Championship in Indore in 2008; and bronze in the 25-m freestyle at the Vinod Ghadge Memorial Swimminig Meet in 2009 in Mumbai. Consider the fact that he turned 85 this year and you realise just how remarkable these achievements are. What's more, he has inspired many young people, who have taken up swimming under his guidance.

(**Harmony**, November 2009)

प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्
बिल्डर अँड डेव्हलपर्स

आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ REALITY SOLUTIONS

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 40006
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


BOOK POST

If undelivered, please return to

संपादिका : 'हितगुज'
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, या शुभेच्छा!


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल: (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in वेबसाईट: www.marathepratishthan.org